(१) सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याबाबतची सद्यस्थिती (२) बेकायदेशीरपणे २००६ पूर्वीची खुसपटे काढून सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयाने उभे केलेले पडताळणीचे थोतांड (३) नेटसेटमुक्त शिक्षकांच्या बाबत २७ जुन २०१३ चा शासननिर्णय (४) त्याबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ९ ऑगस्ट २०१३ च्या बैठकीमध्ये सम्मत केलेला ठराव (५) नेटसेटमुक्त शिक्षकांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी दिलेला निर्णय (६) त्यानंतर निर्माण झालेल्या स्थितीमध्ये करावयाच्या उपाययोजनाबाबतचा महासंघाचा ठराव इत्यादीबाबत तपशीलाने माहिती देण्याकरीता नागपूर व अमरावती येथे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या विद्यापीठस्तरीय बैठकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. बैठकीचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे. त्या त्या विद्यापीठ क्षेत्रातील सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.- **डॉ. अनिल ढगे, सचिव, नुटा**

**तक्ता**

### नागपूर व अमरावती येथे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या मेळाव्यांचे आयोजन

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | सी.पी. अॅन्ड बेरार कॉलेज, तुळशीबाग, महाल नागपूर | रविवार, दिनांक ०१ सप्टेंबर, २०१३ | सकाळी ११.०० वाजता |
| संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. | केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती | शनिवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१३ | दुपारी ४.०० वाजता |

**(E)** अगदी काटेकोरपणे तारखा नमूद करावयाच्या झाल्या तर अमरावती विद्यापीठाच्या "Statutes Book 2001" मध्ये पृष्ठ क्रमांक २८३ वर त्या विद्यापीठाचा सन २००१ चा परिनियम क्रमांक २ प्रसृत केला आहे. त्याच्या शिर्षभागी "Received assent of the Chancellor vide his office letter No. CS/AU/STT/43/00/A(3727)/98 dated 11th January 2001" असे नमूद आहे. मा. राज्यपालांनी सम्मती दिल्याशिवाय कायद्यातील तरतुदीप्रमाणे परिनियम अस्तित्वात येतच नाही, अशी वस्तुस्थिती आहे. येथे हेही नमूद केले पाहिजे की त्याच्या जवळ जवळ एक वर्ष अगोदर दिनांक ३० डिसेंबर १९९९ रोजी अमरावती विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंनी परिनियमाऐवजी विद्यापीठ कायद्याच्या कलम १४ (८) अन्वये त्यांना असलेल्या अधिकारांचा वापर करून निदेश निर्गमित केले होते.

**(F)** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे मा. कुलगुरू श्री. माणिकराव साळुंके यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांना दिनांक ५ ऑगस्ट २००८ रोजी पत्र लिहून पुढील प्रमाणे कळविले. :-

"Since NET/SET condition was not inducted as a part of compulsory qualification of teachers, at the recruitment level by legal instrument, hundreds of candidates without NET/SET, have been recruited from 1991 till the Cut Off date of 7th January, 2000 in this University area. Naturally, advertisements were approved, Selections of teachers were made, approvals were also duly granted by the Universities including our University, also, and further because it was perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100 % salary grants, including annual increments, had been paid by the State Govt. as well as by the UGC also (by way of revised scales from 01.01.1986), in respect of such lawfully recruited teachers year after year from 1991 and such teachers continue to be paid so even today.

In this respect, it is important to look at the second provisio, as given in the second para of the UGC Regulations dated 4th April, 2000, which reads thus : **"Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidates, having had the then requisite minimum qualifications as were existing at that time through duly constituted Selection Committees for making appointments to the teaching posts, have been made prior to the enforcement of these regulations**" (the emphasis provided.)

आठवडा दोन आठवड्याचा फरक इकडे तिकडे पण महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात अशीच व सारखीच परिस्थिती होती.

**(G)** Sant Gadge Baba Amravati University has completed the process of placement before 26 th May 2010 in respect of the 802 teachers who have been granted exemption by UGC. The certificate to that effect have also been issued to each one of them, wherein it is stated that :-

"**Now therefore, it is hereby certified that** every teacher included in the said list who was appointed on or before 4th April 2000 and has been granted exemption from NET/SET by the UGC and whose name is mentioned in the said list is a confirmed teacher in as much as his/her services were confirmed after a period of two years (24 months) from his/her date of appointment as per the provisions of Statute 53 of this University. Further he/she has been granted Exemption by the UGC from NET/SET vide UGCs above mentioned letter. **Further it is the view of this University that his/her case is covered by proviso 2 of UGC Regulation 2000** as has been communicated by the Vice-Chancellor of this University vide his letter No. AU/8/10/C-2140/2002 dated 10-12-2002 to the UGC. All contents of the said letter including Para 12(A) are equally applicable *mutatis-mutandis* to his/her case also.

**In view of this the service of every teacher** (whose name appears in the said list and who was appointed on or before 4 th April 2000 and in whose case the procedure of placement in Senior Scale/Selection Grade through duly constituted selection committee is completed) **is counted from the date of his/her appointment for the purposes of placement in Senior Scale / Selection Grade.**

Since, facts of the case are common in respect of all the teachers included in the said list, this common certificate is hereby issued for the purposes of fixation and placement as per the provision of Para 12 of Annexure-A of the direction No. 21 of 2009. "

**Sd/- Registrar** Sant Gadge Baba Amravati University, Amravati."

**(H)** सर्वोच्च न्यायालयाच्या त्या महत्वपूर्ण निर्णयाबाबत महाराष्ट्र शासनाची भूमिका जाणून घेण्यासाठी विचारण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक १९५२१ हा ११ डिसेंबर २००१ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट होता. "**नेटसेटची परीक्षा उमेदवारांसाठी सक्तीची करणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९९१ च्या रेग्युलेशनबाबत एका प्रकरणात (सिव्हील अपील नं.१८१९/१९९४ ए.आय.आर. सुप्रिम कोर्ट ३३६) सर्वोच्च न्यायालयाने या रेग्युलेशनची तपशीलवार चिकित्सा करणारा अंतिम निर्णय दिला व विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे रेग्युलेशन शिफारशीच्या (रेक्मेंडटरी) स्वरुपाचे असून त्या शिफारसी राज्य शासनाने किंवा विद्यापीठाने सक्तीच्या केल्यास पुढील काळात सेवेत येणाऱ्या अर्जदारांना लागू राहतील (प्रॉस्पेक्टीव्ह) असा स्पष्ट निवाडा सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे, हे खरे आहे काय;**" या प्रश्न भाग १ ला मा. उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यानी एका शब्दात "**होय**" असे ठाम उत्तर दिले होते. *(तिसरे अधिवेशन २००१: मंगळवार, दिनांक ११ डिसेंबर २००१: महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक ७, पृष्ठ ३९)*

**१५. (A) शिफारशीच्या स्वरूपाचे रेग्युलेशन गेले व सक्तीचे रेग्युलेशन आले :-** इतर कोणाला माहिती असो अथवा नसो विद्यापीठ अनुदान आयोगाला आपले १९९१ चे रेग्युलेशन हे शिफारशीच्या स्वरूपाचे आहे हे ठाऊक झाले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद २१ मध्ये मा. न्यायालयाने स्पष्टपणे "The first proviso to Cl.2 permits relaxation in the prescribed qualifications by a University ..... This is because the said Regulations, made under the provisions of S. 26(1) (e), define the qualifications that are **ordinarily and not invariably required of a lecturer.**" असे नमुद केले होते. विद्यापीठ अनुदान आयोग कायदा १९५६ मधील योग्य तरतुदींचा वापर करुन त्यानंतर सन २००० मध्ये आयोगाने सक्तीचे रेग्युलेशन काढले. त्याच्या सुरुवातीला असे नमुद केले होते की, "In exercise of the powers conferred by clause (e) & (g) of sub-section (1) of Section 26 read with Section 14 of University Grants Commission Act, 1956 (3 of 1956), and in supersession of the Regulations issued under University Grants Commission letter No.F.1-93/74 (CPP) Part (v) dated 13th June,1983 and No.F.1-11/87 (CPP-II) dated 19th September,1991 and Notification No.1-93/74(CP) dated 19th February, 1985, 26th November, 1985 and No.F.3-1/94 (PS) dated 24th December, 1998, the University Grants Commission hereby makes the following regulations, namely" अशा रितीने सन १९९१ चे रेग्युलेशन ४ एप्रिल २००० रोजी इतिहासजमा झाले.

(B) कायद्यातील अधिकारांचा वापर करून नेटसेटची पात्रता सक्तीची करणारे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन ४ एप्रिल २००० रोजी निर्गमित झाले व त्याच तारखेपासून या रेग्युलेशनच्या परिच्छेद २ नुसार 'नेटसेट पात्रता' सक्तीची करण्यात आली. तथापि त्या परिच्छेदाच्या दुसऱ्या परंतुकामध्ये यापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांना 'ती' पात्रता लागू राहणार नाही अशी तरतुद स्पष्टपणे पुढील शब्दात करण्यात आली. :- "Provided further that these regulations shall not be applicable to such cases where selections of the candidates having had the then requisite minimum qualification as were existing at that time through duly constituted Selection Committees for making

appointments to the teaching posts have been made prior to the enforcement of these regulations. "

(C) **विद्यापीठ अनुदान आयोगाने ही सारी स्थिती विचारात घेवून व महाराष्ट्रातील 'हगोडा' लक्षात घेऊन ३ एप्रिल २००० ही 'कट ऑफ डेट' ठरविली व फक्त महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांसाठी ती लागू केली. विद्यापीठ अनुदान आयोगाचे १९९१ चे रेग्युलेशन मा. सर्वोच्च न्यायालयाने शिफारशीच्या स्वरुपाचे आहे, असा निर्णय दिलेला होता.** त्यामुळे कायद्यातील शक्तीचा वापर करून नेटसेट सक्तीचे करणारे उपरोक्त नवे रेग्युलेशन ४ एप्रिल २००० रोजी त्या आयोगाने निर्गमित केले होते, ३ एप्रिल २००० ही 'कट ऑफ डेट' आयोगाने निश्चित करण्याचे हेच प्रमुख कारण होते. विद्यापीठ कायद्यातील अधिकारानुसार मा. राज्यपालांनी सम्मती दिलेल्या परिनियमांनी, त्या कायद्याने दिलेल्या अधिकारांचा वापर करून मा. कुलगुरुंनी काढलेल्या निदेशांनी व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटसेट सक्तीचे करणाऱ्या रेग्युलेशन्सनी **ठरवून दिलेल्या 'कट ऑफ डेट' बाजूला राहिल्या व ३५ दिवसाच्या आत मृत्यूमुखी पडलेल्या २३ ऑक्टोबर १९९२ च्या शासन निर्णयातील 'कट ऑफ डेट' चा मुद्दा उच्च शिक्षण विभागाने आता २० वर्षांनंतर उकरून काढला व आपले हसे करून घेतले आहे. "या बाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम असेल" असे उच्च शिक्षण मंत्री, मुख्य सचिव, उच्च शिक्षण सचिव यांनी लेखी कबूल केले असतांना आता ऑक्टोबर १९९२ च्या 'त्या' शासननिर्णयाच्या मुद्याला उच्च शिक्षण विभाग हारतुरे घालत असल्याचे दृष्य नुसते हास्यास्पद नव्हे तर केविलवाणे सुद्धा आहे.**

### *(F) परिच्छेद १५*

**१६.** या शासननिर्णयातील परिच्छेद १५ हा हास्यास्पद मजकुराचा उत्तम नमुना आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय मान्य करायचा नव्हता तर बॅगा भरभरून प्रकरणे मान्यतेसाठी त्यांच्याकडे पाठविली कशासाठी? आयोगाचा निर्णय शिक्षकांच्या विरोधात असेल तर तो आनंदाने मान्य करावयाचा व तो शिक्षकांना अनुकूल असेल तर त्याच्यावर कोणतीही कारवाई करावयाची नाही. सन १९९१ ते २००० या काळातील सर्वच नेटसेट मुक्त शिक्षक एकाच प्रकारात असून त्याबाबत एक एका प्रकरणी सुरुवातीला आयोग वेगवेगळे निर्णय देत होते, तोवर या नोकरशाहीला आनंद होत होता. **कायद्याचा विचार करता ते सर्व एकाच प्रकारात मोडतात याची जाणीव झाल्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने या सर्व शिक्षकांसाठी एकच धोरणात्मक निर्णय घेतला तरी परिच्छेद १५ चा पूर्वार्ध काळजीपूर्वक नजरेखालून घातला तर या शिक्षकांचे बहू प्रकार करून त्यांना वेगवेगळी वागणूक देण्याची उच्च शिक्षण विभागाची "नशा" अजिबात उतरलेली नाही असे दिसून येते.** हा परिच्छेद १५ चा पूर्वार्ध पुढील प्रमाणे :- "१५. दिनांक २३.१०.१९९२ ते दिनांक ३.४.२००० या कालावधीतील ज्या बिगर नेट/सेट अध्यापकांना (~~नी~~) त्यांच्या सेवाकालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिव्याख्याता पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता (नेट/सेट/पीएच.डी/एम.फील) प्राप्त केली नाही. अशा अध्यापकांना खालील अटींच्या अधीन राहून त्यांच्या सेवा सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास शासन मान्यता देत आहे."

**१७.** या १५ व्या परिच्छेदाचा उत्तरार्ध तर आणखीच हास्यास्पद आहे. तो पुढील प्रमाणे :- "(अ) संबधित अध्यापकाची नियुक्ती नियमित स्वरुपात (Regular Basis) असावी. (ब) संबंधित अध्यापकांची नियुक्ती विहीत केलेल्या सर्व कार्यपद्धतीचे अनुपालन करून केलेली असावी. (क) संबंधित अध्यापकांच्या नियुक्तीस नेट/सेट अर्हतेची अट वगळता इतर सर्व विहीत अर्हता व अटींची पूर्तता करून विद्यापीठाकडून मान्यता देण्यात आलेली असावी. (ड) संबंधित अध्यापकांचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेसाठी विद्यापीठाकडून सादर करण्यात आलेला असावा." त्यातील चार अटी विद्यापीठ अनुदान आयोगाने तपासणे ही वेगळी गोष्ट आहे. या प्रत्येक नेमणुकीच्या बाबतीत या चारही बाबी तपासूनच तर उच्च शिक्षण संचालक व सहसंचालकांच्या यंत्रणेने त्यावेळी वेतन अनुदान अदा करण्याचे काम पार पाडले होते. "नशापाणी न घेता आम्ही हे काम पार पाडले आहे" अशा प्रकारचे प्रमाणपत्र त्या प्रत्येक शिक्षकाने या यंत्रणेकडून प्राप्त करून घेतले नाही ही गोष्ट खरी असली तरी याबद्दल त्या शिक्षकांना दोष कसा देता येईल आणि उद्यातरी असे प्रमाणपत्र त्यांना कोण देणार आहे? ज्या सहसंचालकांनी गेली १५-२० वर्षे सातत्त्याने वेतन अनुदान मंजूर केले तेच आता "कसे काय मंजूर केले?" याची चौकशी करणार. हास्यास्पद वर्तनाच्या कमाल मर्यादा ओलांडण्याचा पुरावा म्हणून हा १५ वा परिच्छेद व १६ वा परिच्छेद नमूद करता येईल.

### *(G) परिच्छेद १६*

**१८.** या शासननिर्णयातील परिच्छेद १६ पुढील प्रमाणे आहे.:- "१६. दिनांक २३.१०.१९९२ ते ३.४.२००० या कालावधीतील अध्यापकांची प्रकरणे गुणवत्तेवर तपासण्यासाठी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करावी. सदर छाननी समितीने संबंधित अध्यापकांच्या निवडीच्या जाहिराती पासून नियुक्ती आदेशापर्यंतची सर्व कार्यवाही नियमानुसार झाली किंवा कसे तसेच पद रिक्त असणे, सामाजिक आरक्षणाचे पालन होणे व तत्सम सर्व बाबींची काटेकोर तपासणी करून त्याचा स्वयंस्पष्ट अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा व त्यानंतर संचालक स्तरावर अंतिम मान्यता देण्यात यावी." हास्यास्पदतेचा १५ व्या परिच्छेदाचा गुण या १६ व्या परिच्छेदामध्ये सुद्धा विपूल प्रमाणात व ठासून भरलेला आहे.

**१९.** मुळात विचार केला तर सहसंचालक उच्च शिक्षण या नावाची जी कार्यालये, व्यवस्था व आस्थापना आज दिसत आहे ही आस्थापना "वेतन व्यवस्था" अस्तित्वात येण्यापूर्वी अस्तित्वातच नव्हती. सन १९७७ मध्ये "*A scheme to ensure regular and full payment by College Managements of the salary and allowances of the teaching and non-teaching staff of aided non-Government Colleges of Arts, Science, Commerce and Education in Maharashtra.*" या मथळ्याचा शासननिर्णय २१.९.१९७७ रोजी निर्गमित झाला. "**Resolution No. NGC-1277/122166/XXXII (Cell)** Mantralaya Annexe, Bombay 400 032, **dated 21st September 1977**" असे या शासननिर्णयाचे क्रमांकन व दिनांकन होते. २१ सप्टेंबर १९७७ याच तारखेला "Strengthening of the Directorate of Education - Higher education'' या मथळ्याचा दुसरा एक शासननिर्णय निर्गमित झाला. वेतन व्यवस्थेची अम्मलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रातील सात शैक्षणिक विभागाच्या मुख्यालयी ओएसडी (Officer on Special Duty) या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली ७-८ कर्मचारी सोपवून ही कार्यालये सुरू करण्यात आली. पुढे 'ओएसडी' या पदाची दर्जोन्नती करून 'अेओ' (Administrative Officer) अशा संबोधनाने त्या अधिकाऱ्याला पदनामित करण्यात आले. पुढे पुन्हा दर्जोन्नती करुन ते पद सहसंचालक उच्च शिक्षण असे उन्नत करण्यात आले व कर्मचारी वर्गसुद्धा मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आला.

**२०. आज सहसंचालक उच्च शिक्षण या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली जी आस्थापना काम करीत आहे त्या आस्थापनेला, त्या आस्थापनेचा जन्म झाला तेव्हा पासून तर आज पावेतो दुसरे कोणतेच काम नसून आज परिच्छेद १६ मध्ये त्यांना जे काम करायला सांगण्यात आले आहे तेच तर त्यांचे प्रमुख काम आहे व होते.** आजच्या सहसंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून त्यांना तेच काम पुन्हा करायला सांगणे म्हणजे शासननिर्णय काढून "सन १९९१ ते २००० या काळातील सहसंचालकांच्या नेतृत्वाखालील आस्थापनेमध्ये नालायक लोकांचा भरणा होता. त्यांनी त्यांचे काम बरोबर केलेले नाही, "नशापाणी न घेता आम्ही ते काम केले होते" असा दाखला प्रत्येक शिक्षकांच्या नस्तिवर त्यांनी चिकटवला नाही. सबब त्याच दर्जाच्या लायक यंत्रणेकडून आम्ही तेच काम पुन्हा करवून घेत आहोत" अशी जाहीर दवंडी देण्याचा प्रकार अति हास्यास्पद या वर्गवारीतच मोडतो.

### *(H) परिच्छेद १७*

**२१.** या देशाच्या घटनेतील तरतुदी, सेवाशर्तीच्या नियमांच्या बाबतीत वेगवेगळ्या कायद्यांनी व मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयांच्या निर्णयांनी स्थापित झालेले व स्थिर झालेले मानदंड यांची माहिती करून घेण्याची उच्च शिक्षण विभागात कोणालाही व कोणतीही गरज वाटत नाही व त्यामुळेच या शासननिर्णयात साळसुदपणे पुढील प्रमाणे १७ वा परिच्छेद टाकण्यात आला आहे. :-

"१७. तसेच उक्त कालावधीतील ज्या अध्यापकांना त्यांची पुर्वीची सेवा ग्राह्य धरुन यापूर्वी प्राचार्य किंवा तत्सम पदावर नियुक्ती दिली असल्यास, त्याचप्रमाणे प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनवाढी व त्यानुसार अदा करण्यात येत असलेले वेतन अबाधित राहील. **ह्या दोन मुद्यां संदर्भात स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.**"

वस्तुतः मंत्रिमंडळाच्या मूळ निर्णयामध्ये या शिक्षकांपैकी जे प्राचार्य झालेत त्यांच्याबाबत कोणताही उल्लेख नाही. त्याचा तसा परिणाम होईल ही गोष्ट संघटनेने वारंवार शासनाच्या व योग्यवेळी मा. न्यायालयाच्या लक्षात आणून दिली होती. मा. उच्च न्यायालयाच्या १० मे, २०१३ च्या निर्णयामध्ये याबाबत उल्लेख आहे. त्यामुळे या १७ व्या परिच्छेदातील शेवटच्या वाक्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. मात्र ते वाक्य टाकल्यामुळे या ३००-४०० प्राचार्यांना मंत्रालयाच्या भोवती चकरा मारायला लावण्याची एक 'सुंदर' व्यवस्था या निर्णयाने 'तापलेला तवा' म्हणून तजवीज करून ठेवली आहे. त्यावर 'पोळी' यथावकाश भाजण्यात येईल, यापेक्षा वेगळा अर्थ १७ व्या परिच्छेदातील शेवटच्या

वाक्यातून निघत नाही.

### *(I) परिच्छेद १८*

२२. **या शासननिर्णयातील परिच्छेद अठराचे जेवढे रसग्रहण करावे तेवढे थोडेच आहे.** हा परिच्छेद १८ पुढील प्रमाणे आहे. :- "१८. सदर अध्यापकांच्या सेवा शासन निर्णय निर्गमित झाल्याचा दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला असल्यामुळे या अध्यापकांना शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील." मुळात सेवानिवृत्ती वेतनाचा लाभ हा उच्च शिक्षण विभागातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी शिक्षकांना दिलेली 'देणगी' नव्हे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटना, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या संघटना तसेच विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या संघटनांनी अनेक वर्षाच्या प्रयत्नांनी व प्रदीर्घकालीन संघर्षानंतर प्राप्त करून घेतलेली ती एक सेवाशर्ती विषयक उपलब्धी आहे. मंत्रिमंडळाला चुकीची माहिती पुरविल्यामुळे ह्या सेवाशर्ती आपण उध्वस्त करू शकू हा नोकरशाहीचा भ्रम जेवढ्या लवकर दूर होईल तेवढे उच्च शिक्षण क्षेत्राच्या हिताचे होईल.

२३. सन १९८२ पूर्वी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना पेन्शन योजना लागू नव्हती. त्यांना "सीपीएफ" योजना लागू होती. अनेक वर्षाच्या संघर्षानंतर सन १९८३ मध्ये "*Extending pension-cum-Gratuity Scheme to the teaching and non-teaching staff of the non-Agricultural Universities and the affiliated non-Government Colleges*" या मथळ्याच्या एका शासननिर्णयाने सेवानिवृत्ती योजना त्यांना लागू झाली. "***Resolution No. NGC-1283/(865)-UNI-4,*** **Mantralaya Annexe, Bombay-400 032 Dated the 21st July, 1983**" असे या शासन निर्णयाचे क्रमांकन व दिनांकन होते. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना ही योजना लागू करणाऱ्या या शासननिर्णयाच्या पहिल्याच परिच्छेदात पुढील प्रमाणे मजकूर आहे. :- "Government is now pleased to direct that the Pension, Gratuity and other retirement benefits admissible to the Maharashtra State Government servants under the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, including the Family Pension, 1964 contained therein should be made applicable to the full time approved teaching and the non-teaching staff in recognised aided non-Government Arts, Science, Commerce and education colleges and the non-Agricultural Universities in the State who retired or retire on or after 1st October, 1982."

२४. देशाची घटना व कायदा असे म्हणतो की कोणतीही नवी योजना कितीही चांगली असली तरी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना "जुनीच योजना" ठेवायची की नवी स्वीकारावयाची याचा पर्याय (ऑप्शन) निवडण्याची संधी द्यावीच लागेल. चौथ्या, पाचव्या किंवा सहाव्या वेतन आयोगाची व्यवस्था लागू करतांना आम्हाला जुनीच व्यवस्था चालू ठेवावयाची आहे असे म्हणणारा कदाचित एकही व्यक्ती नसेल पण तसा ऑप्शन मात्र सर्वांनाच उपलब्ध करून द्यावाच लागतो. सेवानिवृत्ती वेतन योजना लागू झाली तेव्हा सेवेत असलेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांना जुन्या "सीपीएफ" योजनेत रहायचे की सेवानिवृत्ती योजना स्वीकारावयाची असा विकल्प देण्यात आला होता. बहुसंख्य लोकांनी निवृत्तीवेतन योजना स्वीकारली हे खरे असले तरी निदान २-४ टक्के लोकांनी शेवटपर्यंत "सीपीएफ"मध्ये राहणेच पसंत केले.

२५. जे शिक्षक १ ऑक्टोबर १९८२ नंतर सेवेत आलेत त्या सर्वांना सेवानिवृत्ती योजनाच लागू राहील. त्यांना जुनी "सीपीएफ" ची योजना का सेवानिवृत्ती योजना असा पर्याय निवडण्याची मुभा असणार नाही. अशी स्पष्ट तरतुद या १९८२ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद २ (१) (b) व (c) मध्ये आहे ती पुढील शब्दात "Employees recruited on or after 1st October, 1982 **should automatically be governed by the Pension Scheme.** Such employees will not be allowed to opt for the Contributory Provident Fund scheme. (c) The employees who have completed more than 2 years of a continuous service in a clear vacancy will be treated as holding permanent posts substantively for the purpose of this scheme and the University and college authorities will have to issue suitable instructions in the matter." सन १९९१ ते २००० या कालखंडात सेवेत आलेले हे सारे नेटसेटमुक्त शिक्षक या वर्गात आहेत. सेवेत येतांना त्यांना सेवानिवृत्ती वेतन योजना लागू असेल अशी स्पष्टपणे नियमात तरतुद होती.

२६. यातील प्रत्येक शिक्षकाची सेवा किमान १२ ते २२ वर्षे इतकी झालेली आहे. त्यातील प्रत्येक जण हा स्थायी आस्थापनेवर कार्यरत होता व आहे. मा. राज्यपालाच्या मान्यतेनंतर अस्तित्वात आलेल्या परिनियमानुसार तो आपल्या स्थायी पदावरील सेवेत २ वर्षानंतर कन्फर्म झालेला आहे. मिळाली ती सेवा स्वीकारणारा थोडा फार टक्का प्रत्येकच सेवेत असतो पण वेगवेगळ्या सेवेमध्ये शिरण्याची संधी उपलब्ध असतांना त्या त्या सेवादारांना भरतीच्या वेळी त्या त्या सेवांमध्ये उपलब्ध असलेल्या सेवाशर्तीची तुलनात्मक स्थिती पाहून अमुक एका सेवेत प्रवेश करावयाचा हे ठरविण्याऱ्या उमेदवारांची टक्केवारी सुद्धा बरीच मोठी असते. खरे म्हणजे ही पदे भरतांना जी जाहिरात दिली तिच्या सोबतच दुसरी एक जाहिरात देण्याचा हूकूम सर्व विद्यापीठाना त्यावेळीच उच्च शिक्षण विभागाला देता आला असता. "तुम्ही १९९१ ते ९९ या काळात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक म्हणून सेवेत प्रवेश करीत आहात. आजच्या कायद्याप्रमाणे तुम्ही २ वर्षानंतर कन्फर्मही व्हाल. तुम्हाला पेन्शन योजनासुद्धा आज लागू आहे. पण पुढे २०१३ मध्ये ही भ्रष्ट नोकरशाही तुम्हाला जुन्या पेन्शन योजनेतून काढून नव्या पेन्शन योजनेत ढकलू शकेल" अशा स्वरूपाची जाहिरात त्यावेळी दिली असती तर त्या नोकरशाहीची व त्यांच्या 'हो' त 'हो' मिसळविणाऱ्या राज्यकर्त्यांची केवढी सोय झाली असती.

२७. नजरेआड करता येणार नाही असा आणखी एक कायदेशीर मुद्दा या संदर्भात लहान मुलांच्यासुद्धा लक्षात येण्यासारखा आहे. नवीन पेन्शन योजना सन २००५ च्या एका शासननिर्णयाने (Government Resolution No.CPS-1005/ 126/SER-4 Mantralaya, Mumbai-400032. : Dated 31st October, 2005.) महाराष्ट्रात लागू झाली त्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ४ (a) मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे उल्लेख आहे. :- "4. (a) As mentioned above, new defined contribution pension scheme will be applicable to Government servants who are recruited on or after 1st November 2005 in State Government service to whom the existing pension scheme and General Provident Fund Scheme is applicable. " याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर सेवेत भरती (Recruited) झालेल्या कर्मचाऱ्यांना ही नवी योजना लागू राहील. प्रत्यक्ष भरती सन २००० च्या अगोदर झाली असली तरी निदान "या प्रत्येक शिक्षकांची भरती ही सन २००५ नंतर झालेली आहे असे समजले जाईल" असे वाक्य तरी निदान परिच्छेद १८ मध्ये, खोटे का होईना, पण टाकायला पाहिजे होते. त्या परिच्छेदात "भरती" हा शब्द कोठेही वापरलेला नाही आणि भरती सन २००५ नंतरची नसेल तर त्याला नवी पेन्शन योजना लागू होत नाही. मा. उच्च न्यायालयाच्या निकालामुळे १२ ते २२ वेतनवाढी ज्यांना मिळतात किंवा मिळत आहेत त्यांची भरती सन २००५ नंतर झालेली आहे असे कसे म्हणावे? हाही विचार त्या बिचाऱ्यांसमोर आला नसेल असे म्हणता येत नाही. शासननिर्णयाच्या सर्व परिच्छेदात ते सन २००० पूर्वी भरती झालेले आहेत हे मान्य करायचे मात्र या कामासाठी ते सन २००५ नंतर भरती (तसा शब्द नसला तरी) झालेले आहेत असे मानुन चालण्याचा प्रकार "सत्तेपुढे कायदा वगैरे काही टिकत नाही" हे सिद्ध करणारा असला तरी न्यायालयापुढे ते शहाणपण टिकणार नाही व फक्त कायदाच टिकेल असा या संघटनेचा दृढ विश्वास आहे.

### *(J) इतर बाबी*

२८. भारतीय घटनेप्रमाणे मा. उच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय (Court of Record) असून त्याठिकाणी शासनाच्या वतीने (किंवा कोणाच्याही वतीने) एखादी गोष्ट मान्य करण्यात आली असेल व ती केली जात नसेल तर तो न्यायालयाचा अवमान ठरतो. दिनांक १० मे २०१३ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य न्यायमूर्तीच्या खंडपीठाने W.P.(L) No. 1326 of 2012 या प्रकरणामध्ये जो निर्णय (यापुढे 'उक्त निर्णय' असा उल्लेख) दिला, त्याच्या परिच्छेद १० मधील पुढील मजकूर पहा :- "(10) Learned A.G.P. also states that there will be no recovery of benefits of the past service of the teachers who have become the Principals of the Colleges." असे असतांना त्यांना दिलेल्या वेतनवाढी व देण्यात येत असलेले वेतन अबाधित राहिल असे म्हणावयाचे व लगेच पुढे "**ह्या दोन मुद्यांसंदर्भात स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील**" असे नमूद करावयाचे हा सारा प्रकारच अशोभनीय आहे. शिवाय असे की एकाच प्रकारातील जे कुणी प्राचार्य (Pay Band 37400-67000) झाले त्यांची सेवा सुरुवातीपासून धरू, मात्र वरिष्ठ वेतनश्रेणी साठी (Pay Band 15600-39100) धरणार नाही या कृतीमध्ये घटनेने दिलेल्या समतेच्या हक्काच्या अधिकारांचा होत असलेला भंग खपून जाईल ही भावना भावडेपणाचीच म्हणावी लागेल.

**२९.** उक्त निर्णयाच्या परिच्छेद ४ मधील पुढील मजकूर पहा :- "(4) As regards the above submission, Mr. Saluja states that the State Government will issue G.R. within two weeks from today for granting exemption from NET/SET to those teachers who were appointed between 19 September 1991 and 3 April 2000 after following the regular procedure." दोन आठवड्याच्या आत शासननिर्णय काढण्याचे मा. उच्च न्यायालयासमोर १० मे, २०१३ रोजी मान्य केल्यानंतर तो तसा दोन आठवड्यात कां काढण्यात आला नाही? मा. उच्च न्यायालयासमोर त्यासाठी मुदत वाढवून मागितली असेल तर ती किती वाढवून मिळाली? व त्या मुदतीत सुद्धा शासननिर्णय निघाला नसेल तर तो का निघाला नाही? याबाबतचा खुलासा करणारा लहानसा परिच्छेद या शासननिर्णयात समाविष्ट करण्यात आला असता तर शासनाची प्रतिष्ठा निश्चितपणे वाढली असती. तसे न करता उलटपक्षी ज्यांच्या स्वाक्षरीने शासननिर्णय निर्गमित झाला त्यांची स्वाक्षरी दिनांक ६ जुलै २०१३ रोजी ११ वाजून ५४ मिनिटे व सात सेकंदानी झालेली असतांना सरळ सरळ त्या शासननिर्णयावर २७ जून २०१३ अशी तारीख टाकल्याने शासनाची अप्रतिष्ठा वाढविणारे ते एक कृत्य ठरले.

**३०.** उक्त निर्णयाच्या परिच्छेद ५ मधील पुढील मजकूर पहा :-"(5) Mr. Saluja further states that though regularization will be made with effect from the date of the G.R., the Government and the Universities will protect the pay and the pay fixation including increments already paid to the teachers and therefore, there will be no recovery of annual increments which the teachers have already earned. Similarly there will be no recovery of other benefits." या सर्व शिक्षकांच्या बाबतीत देण्यात आलेली वेतननिश्चिती, देण्यात आलेल्या वार्षिक वेतनवाढी यांचे संरक्षण करण्यात येईल हे किंवा इतर कोणतेही लाभ काढून घेण्यात येणार नाही, असा एका ओळीचा सुद्धा मजकूर या शासननिर्णयात नाही.

**३१.** उक्त निर्णयाच्या परिच्छेद ९ मधील पुढील मजकूर पहा :-"(9) Learned A.G.P. states that teachers who are not yet granted increments i.e. M.Phil and Ph.D. teachers on the ground that they have not passed NET/SET, will be given benefits of the increments from the date of the G.R." या संदर्भात एका ओळीचा सुद्धा उल्लेख या शासननिर्णयात नाही.

**३२.** उक्त निर्णयाच्या परिच्छेद ११ मधील पुढील मजकूर पहा :-"(11) Thus, it appears to be the stand of the State Government that whatever benefits are already given to teachers who have not cleared NET/SET will not be withdrawn from them." त्याच निर्णयाच्या परिच्छेद ७ मधील पुढील मजकूर पहा :- "(7) We are of the view that if any such amounts of pension or family pension already been paid to the retired teachers or families of retired teachers, or if the benefits of incentives in the form of increments for a M.Phil and Ph.D. etc. are given to the teachers, no recovery should be made." खरे म्हणजे मा. न्यायालयाच्या १० मे २०१३ च्या निर्णयातील परिच्छेद ७ व ११ मधील उपरोक्त मजकूर हा मा. खंडपीठाचा आदेश आहे पण त्याबाबतीत एका ओळीचाही मजकूर या शासननिर्णयात दिसून येत नाही.

### *(K) व्याधीनिदान व उपाययोजना*

**३३.** विद्यापीठ अनुदान आयोगाचे स्थाननिश्चितीच्या प्रयोजनासाठी सेवा धरण्याबाबतचे नियम व सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय यांची अवहेलना करणारा हा शासननिर्णय आहे. सन १९९१ ते २००० या काळात सेवेत असलेले सर्व नेटसेट मुक्त अध्यापक हे एकाच प्रकारात मोडतात. आंदोलन सुरू असतांना अशा शिक्षकांची संख्या फक्त २८७७ आहे, असे शासनातर्फे वारंवार सांगितले जात होते. आता या २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद १६ मध्ये ही संख्या ५१६० दाखविली आहे. मा.श्री. दिलीप वळसे पाटील यांनी ही संख्या विधानपरिषद सभागृहात १० हजाराच्या आसपास असल्याचे सांगितले होते. १८ ऑक्टोबर २००१ च्या शासननिर्णयातच ही "संख्या ६००० च्या आसपास होते" असे नमुद आहे. ही संख्या ५ हजार असेल किंवा ६ हजार असेल. **यापैकी एकाही शिक्षकांची सेवा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २१ किंवा २४ प्रमाणे व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाप्रमाणे यापूर्वी नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून धरण्यात आलेली नाही.** आता न्यायालयातील घटनाक्रमामुळे व मा. उच्च न्यायालयाच्या १० मे, २०१३ रोजीच्या निर्णयामुळे २७ जून २०१३ चा शासननिर्णय निर्गमित करतांना ६ मार्च २०१३ चा मंत्रिमंडळाचा क्रुर निर्णय अमलात आणण्याच्या शासनाच्या मनोदयाचा पार विचका झालेला दिसून येतो हे खरे आहे. आता हा शासननिर्णय निर्गमित झाल्यानंतर सन १९९१ ते २००० या कालखंडातील एकाच प्रकारच्या शिक्षकांना महाराष्ट्र शासनाने किती प्रकारची वागणूक दिलेली आहे, तो प्रकार पहाण्यासारखा आहे. :-

(A) २७ जूनचा हा शासननिर्णय निर्गमित झाल्यानंतर त्यात काहीही म्हटले असले तरी किंवा काहीही म्हटले नसले तरी नेटसेटमुक्त शिक्षकांच्या बाबतीत वेतननिश्चितीसाठी व वेतनवाढीसाठी त्यांची सेवा धरलेली आहे ती धरावीच लागेल पण स्थाननिश्चितीसाठी धरणार नाही **असे जे धोरण त्यातून पुढे आले ते विक्षिप्तपणाचेच म्हणावे लागेल.**

(B) त्यांच्यापैकी जे सेवानिवृत्त झाले आहेत त्यांना जुनी सेवानिवृत्ती योजना लागू राहील. त्यांच्याकडून ती काढून घेण्याची किंवा रिकव्हरी काढण्याची कोणतीही शक्ती या शासननिर्णयाने अधिकाऱ्यांना प्रदान केलेली नाही. तसे करणे त्यांना शक्य नव्हते. पण आज सेवेत आहेत त्यांना मात्र निवृत्ती वेतन योजना लागू रहाणार नाही. अशी स्पष्ट तरतुद या शासननिर्णयात करण्यात आल्यामुळे **या शासननिर्णयाची "शोभा" निश्चितच वाढली आहे.**

(C) त्यापैकी जे प्राचार्य झाले किंवा रजिस्ट्रार, परीक्षा नियंत्रक, वित्त अधिकारी या पदावर गेले त्यांची नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरली जाईल इतरांची स्थाननिश्चितीसाठी सुद्धा धरली जाणार नाही. **या भेदभावपूर्ण बाबी घटनेने प्रदान केलेल्या समतेच्या हक्काला बाधा आणणाऱ्या आहेत.**

(D) हे सर्व एकाच प्रकारचे प्राध्यापक आता आयोगाच्या जुलै २०११ च्या एकाच निर्णयाखाली आले हे खरे असले तरी त्यातील 'एक्झमशन' मिळालेल्या शेकडो शिक्षकांची सेवा नेमणूकीच्या दिनांकापासून प्रत्यक्षात धरण्यात आलेली असून त्याप्रमाणे त्यांना स्थाननिश्चिती देण्यात आली व आर्थिक लाभ सुद्धा देण्यात आलेले आहेत. अशा शिक्षकांची संख्या महाराष्ट्रात २ हजाराच्या वर आहे. काही अधिकाऱ्यांनी अशा शिक्षकांची स्थाननिश्चिती रद्द करून त्यांच्यावर 'रिकव्हरी' काढण्याचा बेकायदेशिर प्रयत्न केला असता "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELLATE JURISDICTION : WRIT PETITION NO.1893 OF 2010 " या प्रकरणात दिनांक ३ सप्टेंबर २०१० रोजी दिलेल्या निर्णयात मा.उच्च न्यायालयाने :- "It is also common ground that their pay was fixed in the senior scale and the selection grade earlier. They were also paid in the senior scale and the selection grade as per the Government Resolution dated 11th December, 1999. It is also an admitted position that now by the orders which are impugned in these petitions, the Joint Director, Higher Education has cancelled the order made by him earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade " असे नमूद करुन "The orders impugned in the petitions, **whereby the orders made earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade have been cancelled, are set aside** " असा निर्णय दिला. "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 1991 OF 2011" या दुसऱ्या एका प्रकरणामध्ये सुद्धा २४ मार्च २०११ रोजी मा. उच्च न्यायालयाने तसाच निर्णय दिला अशा शेकडो शिक्षकांची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून धरून त्यांना तसे आर्थिक लाभ मिळत आहेत, मिळाले आहेत.

(E) या एकाच मूळ प्रकारातील जवळ जवळ २ हजार शिक्षकांचा उपरोक्त (D) मध्ये नमूद केलेला उपप्रकार पूर्वीच अस्तित्वात आला असून त्या उपप्रकारातील सर्व शिक्षकांना नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून सर्व लाभ देण्यात आलेले आहेत व त्यांचे लाभ काढून घेण्याचा प्रयत्न मा. उच्च न्यायालयांनी हाणून पाडला. या उपप्रकारातील शिक्षकांची संख्या उच्च शिक्षण विभागातील अधिकारी मोजायलाच तयार नाहीत कारण तेथे त्यांची मान संकोचाने खाली जाते. याच मूळ प्रकारातील सप्टेंबर १९९१ ते ऑक्टोबर १९९२ या काळात सेवेत आलेल्या शिक्षकांचा आणखी एक नवा उपप्रकार या शासननिर्णयानंतर उदयाला आला असून त्यांना उद्या हे सर्व लाभ नेमणुकीच्या दिनांकापासून देय होतील कारण तो त्यांचा हक्कच आहे..

(F) सारांश काय तर, या एकाच प्रकारातील काही शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन द्यावे लागेल, काहींना त्यापासून वंचित ठेवले जाईल, त्यापैकी जे प्राचार्य, रजिस्ट्रार, परीक्षा नियंत्रक, वित्त अधिकारी या पदावर गेले त्यांची सेवा

पहिल्या दिवसापासून मोजली जाईल, इतरांची सेवा स्थाननिश्चितीसाठी सुरुवातीपासून मोजली जाणार नाही, मात्र त्या सर्वांची सेवा वेतननिश्चितीसाठी व वार्षिक वेतनवाढीसाठी सुरुवातीपासून मोजली जाईल, मा. उच्च न्यायालयाने (१० मे पूर्वीच) ज्या प्रकरणात रिकव्हरीचा प्रयत्न हाणून पाडला, अशा अनेकांना नेमणुकीच्या दिनांकापासून सर्व लाभ मिळत आहेत, सप्टेंबर १९९१ ते ऑक्टोबर १९९२ या काळात नेमलेल्या काहीना ते उद्या मिळतील. हा साराच प्रकार भारतीय संविधानाच्या कलम १४ चा सरळ सरळ आक्रमकपणे भंग करणारा आहे व कायद्याच्या समोर संपूर्णपणे समतुल्य असलेल्या व्यक्तींना हिंसकपणे भेदभावपूर्ण वागणूक देणारा आहे. त्या कलमामध्ये असे म्हटले आहे की :-

"**14.Equality before law -** The State shall not deny to any person equality before the law or the equal protection of the laws within the territory of India."

"The guiding principle of the article is that all persons and things similarly circumstanced shall be treated alike both in privileges conferred and liabilities imposed. "Equality before the law" means that amongst equals the law should be equal and should be equally administered and that like should be treated alike."

**३४. उपाय योजनेचा प्रस्ताव :** समोर दिसत असलेल्या व्याधीच्या निदानानंतर त्यामुळे आलेल्या आपत्तीच्या निवारणार्थ उपलब्ध उपाय योजनाचा विचार संघटनांना करावाच लागतो. कामगार चळवळीमध्ये तसेच शिक्षक-प्राध्यापकांच्या संघटनामध्ये काम करणाऱ्या सर्वांनाच याची माहिती आहे की प्रश्न सोडविण्याच्या अनेक मार्गापैकी तीन मार्ग प्रमुख म्हणून सांगता येतील. **एक म्हणजे** आंदोलनाचा किंवा चळवळीचा मार्ग, **दुसरा म्हणजे** विधानमंडळाच्या माध्यमातून सांसदिय आयुधांच्या वापराचा मार्ग व **तिसरा म्हणजे** न्यायालयाचा मार्ग. चळवळी व आंदोलने हा संघर्षाचा मार्ग सर्वोत्तम मानला गेला असला तरी तो सर्वकाळीचा उपाय म्हणून सर्वोपरी वापरता येत नाही. शांततेच्या काळात आपल्या व्यावसायिक जीवनाविषयी सहानुभूती वा ममत्व असलेल्या विधानमंडळ सदस्यांची मदत घेऊन सांसदीय आयुधांच्या माध्यमातून अशा संघटना आपले काही प्रश्न सोडवून घेतात. या दोन मार्गानी प्रश्न सोडवून घेण्याच्या मर्यादा लक्षात घेऊन न्यायालयीन संघर्षाचा मार्ग समस्या सोडविण्याचा रामबाण उपाय म्हणून देशभर अनेक संघटनांनी अमलात आणल्याचे आपल्याला दिसून येईल. आपण याचिका दाखल केलेली नसतांना कायद्याचे प्रश्न अंतर्भूत असल्यामुळे वेळेवर १०.३० वाजता प्रतिज्ञापत्र दाखल करुन १२.३० वाजता महासंघाला दिनांक १० मे २०१३ रोजीच्या न्यायालयीन घडामोडीत जे भरघोस यश मिळाले ते याबाबतचे ताजे उदाहरण म्हणून नमूद करता येईल. मात्र समस्यांच्या निवारणार्थ या तिसऱ्या मार्गाचा वापर करावयाचा असेल तर घटना व कायद्याच्या ज्ञानाबरोबरच रस्त्यावरच्या संघर्षातून सुटू शकणारे प्रश्न कोणते? न्यायालयीन संघर्षातून सुटू शकणारे प्रश्न कोणते? यातील फरक बिनचूकपणे ओळखण्याची क्षमता ही आवश्यक बाब असते. मागण्यांच्या स्वरुपाचे प्रश्न सोडवून घेण्यासाठी न्यायालयीन मार्गाचा फारच मर्यादित उपयोग होतो किंवा उपयोग होत नाही असे म्हटले तरी चालेल. मात्र घटनात्मक तरतुदींचा भंग होत असेल, समतेच्या हक्काला बाधा येत असेल, उपविधी किंवा उपविधानाची (Subordinate legislation) अम्मलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने करण्यात येत असेल किंवा मा. उच्च अथवा सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निवाड्यांच्या विरोधात किंवा त्याकडे दुर्लक्ष करून कोणी "कारभार" करीत असेल, अशावेळी न्यायालयीन मार्गाचा वापर अत्यंत प्रभावी ठरतो. हे लक्षात घेता आता या प्रकरणी न्यायालयीन मार्गाचाच वापर करण्याचा विचारपूर्वक निर्णय घेण्यात येत असून त्याची निर्धारपूर्वक अम्मलबजावणी करण्याचे ठरविण्यात येत आहे.

नेटसेट मुक्त शिक्षकांचा हा प्रदीर्घ संघर्ष आता शेवटच्या निर्णायक टप्प्यावर आलेला असून सर्व शक्तीनिशी त्याला सामोरे जाण्याचा सर्वांनीच निर्धार व्यक्त करण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाने सन १९९१ ते २००० या काळातील हे सर्व शिक्षक एकाच प्रकाराखाली आल्यामुळे या न्यायालयीन संघर्षाची मुख्य आघाडी संघटनेतर्फेच सांभाळली जाईल, असेही ठरविण्यात येत आहे. तद्उपरांन्त विद्यापीठनिहाय वेगवेगळी वस्तुस्थिती, तत्थ्ये, आकडेवारी, घटनाक्रम व तारखा लक्षात आणून देण्यासाठी तसेच राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवरील नामांकित विधिज्ञांचे अतिरिक्त बळ, **गरज पडल्यास,** या न्यायालयीन संघर्षामध्ये शिक्षकांनी विद्यापीठनिहाय व जिल्हानिहाय स्वतंत्रपणे संघटीत होऊन उभे करण्याची बाब स्वागतार्हच समजली जाईल.

**(३५)** मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण असा निर्णय दिलेला आहे.

**(एक)** त्या याचिकेत वादी असलेल्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या विद्यापीठाच्या परिनियमांनी घालून दिलेल्या प्रक्रियेप्रमाणे झालेल्या आहेत. असे या निर्णयाच्या पहिल्याच परिच्छेदात पुढील शब्दात नमुद आहे. "All the petitioners have been appointed after following the procedure laid down under the Statutes framed by the University."

**(दोन)** हे सर्व अधिव्याख्याते इतर सर्व पात्रता पूर्ण करित असले तरी ते नेटसेट पात्रता धारण करीत नसल्यामुळे विद्यापीठांनी त्यांना 'अॅडव्हॉक अप्रुव्हल' दिले होते. उच्च शिक्षण संचालक व सहसंचालक यांनीसुद्धा त्यांची मान्यता 'अॅडव्हाक' धरली होती. अशा रितीने गेली अनेक वर्षे त्यांच्या नेमणूका तदर्थ समजल्या गेल्यात. असेही या निर्णयाच्या परिच्छेद २ व ३ मध्ये नमुद आहे.

**(तीन)** नेटसेटची पात्रता ते धारण करीत नव्हते एवढी एक बाब जर सोडली तर त्यांची नेमणूक, (निवड) त्या नेमणूकीला मान्यता व त्यानंतर नेमणूकीचा आदेश या सर्व बाबी अस्तित्वात असलेल्या "रुल्स् व रेग्युलेशन्स"नुसारच झालेल्या आहेत, याबद्दल कोणताही वाद (dispute) नाही. राज्य शासन, संचालक व सहसंचालक उच्च शिक्षण यांना व विद्यापीठ अनुदान आयोगालासुद्धा ती गोष्ट मान्य आहे. ही बाब या निर्णयाच्या परिच्छेद ४ मध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आली आहे. "It is not in dispute on the part of the University Grants Commission or even by the respondent Nos. 1 to 3 that **petitioners were appointed, granted approval and their appointments were made in conformity with the rules and regulations,** except the passing of NET/SET examination."

**(चार)** या प्रकरणाची आमच्यासमोर सुनावणी सुरु असतांनाच्या दरम्यान सहसंचालक उच्च शिक्षण यांनी एक अतिरिक्त शपथपत्र आमच्यासमोर दाखल केले असून त्याला जोडून २७ जून २०१३ चा शासननिर्णय सुद्धा आमच्या समोर दाखल करण्यात आला आहे असे मा. खंडपीठाने नमुद केले आहे. या शासननिर्णयाचे अवलोकन करता काही शर्तीसह या शिक्षकांची सेवा सर्व प्रयोजनासाठी ग्राह्य धरण्याचे या शासननिर्णयात नमूद आहे असे मा. उच्च न्यायालयाने परिच्छेद १० मध्ये पुढील शब्दात नमूद केले आहे. "On perusal of the Government Resolution dated 27th June, 2013, it is evident that **the services rendered by the teachers in senior colleges, who do not possess NET/SET qualification are liable to be considered for all purposes**"

**(पाच)** सर्व प्रयोजनासाठी या शिक्षकांची सेवा धरल्या गेली पाहिजे याबाबत कोणताही वाद आता शिल्लक राहिलेला नव्हता. फक्त ही सेवा कोणत्या तारखेपासून धरावी लागेल एवढाच मुद्दा शिल्लक उरलेला होता. मा. औरंगाबाद खंडपीठासमोर ही याचिका २०१० मध्ये दाखल झालेली होती. वादी व प्रतिवादींनी आपापली शपथपत्रे, प्रतीशपथपत्रे दाखल केलेली होती. या प्रकरणाची आता ही नियमित सुनावणी होती. मुंबई येथील खंडपीठासमोर मे २०१३ मध्ये झालेल्या सुनावणीच्या वेळी या विषयावर याचिका नव्हती. परीक्षा सुरळीत व्हाव्यात अशी विद्यार्थ्यांच्या एका संघटनेची याचिका सुनावणीला होती. तरी मा. मुख्य न्यायमुर्तींच्या खंडपीठाच्या हा मुद्दा लक्षात आला होता. १८ एप्रिल २०१३ रोजीच्या मा. मुख्य न्यायमूर्तीच्या मुंबई खंडपीठाने विद्यार्थ्यांच्या या याचिके प्रकरणी त्या दिवशीच्या आदेश पत्रात असे नमूद केले आहे की, :- "It appears that the dispute now only is with effect from which date the exemption will be granted by the University and with effect from which date the arrears of salaries will be paid to such teachers."

**(सहा)** वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीची व्यवस्था (CAS) ही विद्यापीठ अनुदान आयोगाची व्यवस्था आहे व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनप्रमाणे अशी स्थाननिश्चिती देण्यासाठी तदर्थ सेवा सुद्धा धरावीच लागते. आयोगाचे तसे एकामागून एक आदेश आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विधी सल्लागारांचा सल्ला घेवून आयोगाने ते आदेश काढल्याचा त्या आदेशामध्येच उल्लेख आहे. ही गोष्ट या महासंघाने वारंवार शासनाच्या लक्षात आणून दिली. गेल्या वेळेला आंदोलनाची धावपळ सुरु असतांना दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजी महासंघाने सम्मत केलेल्या ठरावातील परिच्छेद २५ पुढील प्रमाणे आहे. :-

"२५. या कार्यकारी मंडळाने ही गोष्ट वारंवार विविध निवेदनांच्याद्वारे शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे की स्थाननिश्चिती व वेतननिश्चितीसाठी वेगळ्या शासननिर्णयाची आवश्यकता नाही (इतक्या उपर शासनाला आणखी

एखादा शासननिर्णय काढायचा असेल तर त्याला संघटनेची ना असण्याचे कारण नाही) याबाबतच्या तरतुदी ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयात उपलब्ध आहेत.

(१) सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयामुळेच विद्यापीठ अनुदान आयोगाने आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनासाठी सेवा केंव्हापासून धरावी याबाबत गेल्या अनेक वर्षापासून ठाम भूमिका घेतली आहे. विधीसल्लागारांच्या सल्ल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २५ डिसेंबर १९९८ रोजी एक परिपत्रक काढले होते. (UGC letter D.O. No.F.2-6/98 (PS) dated 25th December 1998) त्यात पुढील प्रमाणे तरतुद आहे. :-

"The commission after seeking legal opinion on clause 1 (e) has decided to include service rendered in adhoc capacity for counting of past service for placement in senior scale/ selection grade, provided that three conditions, as mentioned hereunder are fulfiled. **(a)** The adhoc service was of more than one year duration; **(b)** The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee; and **(c)** The incumbent was Selected to the permanent post in continuation to the adhoc service without any break."

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाने सन १९९८ मध्ये स्थाननिश्चितीसाठी सेवा कोणती धरण्यात यावी याबाबत जी अधिसूचना काढली होती त्या आधारावर राज्य शासनाने दिनांक ६ मार्च १९९९ रोजी "**अधिव्याख्याता (वरिष्ठ श्रेणी/ निवड श्रेणी) पदावर स्थाननिश्चिती करण्यासाठी ग्राह्य धरावयाची सेवा.**" या मथळ्याचा एक शासननिर्णय (क्रमांक युएसजी १२९८/३४०२६/(४७१२)/ विशि-४) काढला. त्याच्या परिच्छेद २ मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे तरतुद आहे :-

"वरील सूचनांतील सूचना क्र. ८.६.० मधील एक वर्षापेक्षा जास्त काळ केलेली तदर्थ सेवा खालील परंतुकानुसार वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी स्थान निश्चिती करताना परिगणीत करता येईल असे कळविले आहे. **(अ)** तदर्थ सेवा ही एक वर्षापेक्षा जास्त कालावधीची होती. **(ब)** उमेदवारांची अधिव्याख्याता पदावरील नियुक्ती विहित केलेल्या निवडसमितीच्या शिफारसीनुसार करण्यांत आली होती. **(क)** उमेदवारांची तदर्थ सेवेला जोडून त्यात कोणताही खंड न पडता स्थायी पदावर नियुक्ती झाली होती."

१९९१ ते २००० या काळातील हे सर्व शिक्षक शासनाने सुरुवातीला 'तदर्थ' म्हणून नामीत केले पण मुळात ते स्थायी पदावर सेवेत कन्फर्म झालेले शिक्षक आहेत. **विद्यापीठ अनुदान आयोगाने नेटसेट मुक्तता दिलेल्या प्रत्येक शिक्षकाची सुरुवातीपासून सेवा धरण्याची तरतुद या शासननिर्णयाप्रमाणे आहे व तो शासननिर्णय आजही जिवंत आहे.**

**No.CIM/ 35 : : Date 15.08.2013**

### CORRECTION in the copy of the Minutes of the General Body Meeting of NUTA

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, the 28 th July, 2013 at Lok Mahavidyalaya, Wardha is circulated in this NUTA Bulletin.

If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to the Secretary (Dr. Anil Dhage, Secretary, NUTA, Sankalp Sahaniwas, Khare Town, Dharampeth, Nagpur-440 010.) by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration.

Please send one copy of your letter to Prof. P. B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan Wadi, Rajapeth, Amravati. 444 601.

**- Dr. A. W. Dhage, *Secretary, NUTA***

(३) आता जून २०१० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनमध्ये (Notified under No.F.3-1/2009 dated 30th June 2010) सुद्धा अशीच तरतुद आहे ती पुढील शब्दात :- "10.0 COUNTING OF PAST SERVICES FOR DIRECT RECRUITMENT AND PROMOTION UNDER CAS: "10.1 (f) The adhoc or temporary service of more than 1 year duration can be counted provided that **(i)** The period of service was of more than one year duration **(ii)** The incumbent was appointed on the recommendation of duly constituted selection committee and **(iii)** The incumbent was selected to the permanent post in continuation to the adhoc or temporary service without any break"

मा. सर्वोच्च न्यायालयाने " Sharadendu Bhushan, Appellant v. Nagpur University, Nagpur & Ors, Respondents" (AIR 1988, Supreme Court 335) या प्रकरणात "experience is the basis of placement." असा जो निर्णय दिला होता त्यावर आधारित ही उपरोक्त व्यवस्था आहे.

(४) जून २०१० चे विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपरोक्त नोटीफिकेशन आल्यावर "**विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ३० जून २०१० च्या अधिसूचनेन्वये शिक्षक व समकक्ष पदांवरील नियुक्त्या सदर पदाचे किमान शैक्षणिक अर्हता, वेतनश्रेण्या, अनुषंगिक लाभ, प्रोत्साहनपर वेतनवाढी इत्यादी बाबीं संदर्भात निर्गमित केलेले आदेश राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना लागू करणेबाबत.**" या मथळ्याचा एक तपशीलवार शासननिर्णय (शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/(२५/११)विशि-१ : मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. दिनांक : १५ फेब्रुवारी, २०११) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केला. उपरोक्त नोटीफिकेशन संदर्भात महाराष्ट्र शासनाचे २३ आदेश उक्त शासननिर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये नमुद आहेत. त्यातील क्रमांक १६ वर शासनाचा पुढील आदेश नमुद आहे. :- "१६. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.३० जून, २०१० च्या अधिसूचनेतील परिच्छेद क्र. १०.० : **शासन आदेश :- या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १०.० ते १०.१ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत.**"

**(सात)** विद्यापीठ अनुदान आयोगाचे एकामागून एक आदेश असून व खुद्द महाराष्ट्र शासनाचे त्याबाबतचे शासननिर्णय जिवंत असून "तदर्थ सेवा धरली पाहिजे" यासाठी महाराष्ट्र शासन तयारच होत नव्हते. शासनाने उत्तरार्थ जे शपथपत्र औरंगाबाद खंडपीठासमोर दाखल केले त्याच्या पृष्ठ ६७ वर परिच्छेद ८ मध्ये एकदा "petitioner's services from the date of appointment till exemption of passing of NET / SET examination, were treated on adhoc basis and therefore the said services were not eligible / qualified for availing the benefits of Career Advancement / Placement." असे नमुद केले. थोडेसे सुरुवातीचे शब्द बदलवून क्रमांक ८ चा परिच्छेद पुन्हा टाकला व तीच आकसपूर्ण शब्दरचना जशीच्या तशी दुसऱ्यांदा टाकलेल्या परिच्छेद ८ मध्ये पुन्हा नमुद केली. मा. खंडपीठाने शासनाच्या शपथपत्रात एकच क्रमांक असलेला परिच्छेद ८ दोन वेळा टाकल्याबद्दल व तीच शब्दरचना पुन्हा दुसऱ्यांदा वापरल्याबद्दल "ती शब्दरचना चटकन लक्षात यावी, उठून दिसावी म्हणून आम्ही (मा. खंडपीठाने) ती (दोन ठिकाणी) मुद्दाम अधोरेखांकित केली" असल्याचे "महत्त्वपूर्ण गौरवोद्‌गार" शासनाच्या त्या शपथपत्राबद्दल आपल्या निकालात नमूद केले आहेत. ते पुढील शब्दात :- "*[quoted from paragraph No. 8 which is marked twice from the affidavit in reply, appearing at page 67 of the petition paper book] [Emphasis on underlined portion is supplied by us].*"

**(आठ)** तदर्थ सेवा धरण्या न धरण्याबाबत शासनाचे काय म्हणणे होते व विद्यापीठ अनुदान आयोगाचे त्याबाबतीत काय आदेश होते हे १ ऑगस्ट २०१३ च्या मा. औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयाच्या परिच्छेद ११ मध्ये नमुद आहे ते पुढील शब्दात :- "It is evident that, an objection is raised by the State that petitioners were treated as adhoc, and hence, they are not entitled for benefit of CAS. However, Annexure B (from page nos. 19 to 32 of paper book) and Annexure C (from page nos. 32 to 35 of paper book), reiterate that the University Grants Commission, has granted recognition and regularization to the appointments of the

petitioners, without passing of NET/SET examination if that deficiency is condoned by the University. **It is also directed that in such eventuality, the benefit of CAS be given to the petitioners.**"

**(नऊ)** त्याठिकाणी नेटसेट पात्रता धारक उमेदवार मिळत नव्हते, म्हणून या नेमणूका त्या काळात करण्यात आल्या. इतर सर्व पात्रता व प्रक्रिया पूर्ण करुनच त्यांच्या नेमणूका झालेल्या आहेत. असे परिच्छेद १२ मध्ये नमुद करून पुढच्याच १३ व्या परिच्छेदात मा. खंडपीठाने असे निरिक्षण नोंदविले आहे की विद्यापीठ अनुदान आयोगाने एक्झम्शन दिले नव्हते तोवर हा "ॲडव्हॉक"चा बोर्ड ठिक होता. पण आता त्यानंतर त्यांना CAS नाकारता येणार नाही. असा स्पष्ट निर्णय परिच्छेद १४ मध्ये मा. न्यायालयाने दिला तो पुढील शब्दात :- "In this situation, the tag of their being adhoc teachers, does not and cannot constitute a ground to deny them the benefit of Career Advancement Scheme, even on Government's own showing, and Annexures B and C referred to hereinbefore."

**(दहा)** शेवटी मा. उच्च न्यायालयाने राज्य शासनाचे म्हणणे पूर्णपणे फेटाळून लावले. राज्य शासन, संचालक व सहसंचालक उच्च शिक्षण हे आता शिक्षकांना CAS नाकारू शकत नाहीत, असा ठाम निर्णय देऊन व्याजासह थकबाकी अदा करण्याचे आदेश मा. खंडपीठाने दिलेत. न्यायनिर्णयाचे ते तीन परिच्छेद पुढील प्रमाणे :-

"(15) The stand taken by the State is wholly unjust and deserves to be rejected.

(16) Therefore, now the respondent Nos. 1 to 3 ought not and cannot deny to the petitioners the benefit of Career Advancement Scheme.

(17) This court, therefore, allows the writ petition in terms of prayer clauses (A) and (B), with modification that interest on arrears shall carry interest @ 6% per annum, from the date when the payment became due. In the circumstances, parties are directed to bear their own costs."

**३६. उपाय योजनेचा सुधारित प्रस्ताव :** मा. औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय येण्यापूर्वी परिच्छेद ३४ मध्ये सुचविलेल्या उपाययोजनेच्या प्रस्तावाच्या मसुद्यामध्ये कोणताही बदल न करता आता १ ऑगस्ट २०१३ नंतर निर्माण झालेल्या स्थितीचा आढावा घेऊन त्याबाबतचे प्रस्ताव सुधारित करण्याची आवश्यकता आहे असे या कार्यकारी मंडळाला वाटते.

**(एक)** हे सर्व नेटसेटमुक्त शिक्षक एकाच प्रकाराखाली आहेत, ही महासंघाची सुरुवातीपासूनची ठाम भूमिका आहे. (१) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ८ जुलै २०११ रोजी विषय क्रमांक २.०९ अन्वये घेतलेल्या निर्णयामुळे हे सारे शिक्षक एकाच प्रकाराखाली आलेले आहेत (२) १९९१ चे रेग्युलेशन शिफारशीच्या स्वरुपाचे होते. (३) ते महाराष्ट्रात एप्रिल २००० पर्यंत कायदेशीररित्या लागूच करण्यात आलेले नव्हते (४) सन २००० मध्ये दिनांक ४ एप्रिल २००० रोजी नेटसेट सक्तीचे करणारे रेग्युलेशन विद्यापीठ अनुदान आयोगाने काढले. त्याच्या खंड २ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये ही पात्रता यापूर्वी सेवेत भरती झालेल्या शिक्षकांना लागू रहाणार नाही असे स्पष्टपणे नमुद आहे. (५) या शिक्षकांबाबत सभागृहात देण्यात आलेली व सभागृहाबाहेर लेखी देण्यात आलेली आश्वासने पाळण्यात आली नाही. (६) खुद्द उच्च शिक्षण मंत्री, मुख्य सचिव, उच्च शिक्षण सचिव यांची तर गोष्टच सोडा पण राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळल्या गेला नाही व महाराष्ट्रातील शिक्षकांचा विश्वासघात करण्यात आला. हे मुद्दे या प्रकारातील सर्वांनाच लागू आहेत. (अशा सर्व मुद्यांचे आणखी तपशिल मांडण्याची गरज नाही.) या सामायिक मुद्यांबाबतची याचिका सामायिकरित्या महासंघातर्फे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबईस्थित मुख्य खंडपीठासमोर दाखल करण्यात येईल.

**(दोन)** मा. औरंगाबाद खंडपीठाच्या दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजीच्या निर्णयामुळे थोडासा वेगळेपणा आपल्या लक्षात आला असून थोडासा आणखी विचार करता वेगळेपणाचे आणखी काही मुद्दे आपल्या लक्षात येतात. या निकालाचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास वेगळेपणाचे हे सर्वच मुद्दे संघटनेने याबाबत घेतलेल्या भूमिकेची बलस्थाने असून त्यांचा यथोचित वापर होणे आवश्यक आहे. असे या कार्यकारी मंडळाला वाटते. ही वेगवेगळी बलस्थाने कोणती आहेत. याची नोंद घेणे आवश्यक वाटते. (१) अनेक शिक्षकांची निवड होतांना मान्य झालेल्या व प्रसिद्ध झालेल्या जाहीरातीत नेटसेट पात्रतेचा अजिबात उल्लेख नव्हता. (२) अनेक शिक्षकांच्या बाबतीत ही मान्यता त्यावेळी कायम स्वरुपी (ONWARD) देण्यात आलेली आहे. (३) अनेक शिक्षकांच्या बाबतीत दोन वर्षाच्या सेवेनंतर त्यांना सेवेत कायम करण्याचे परिनियम त्या त्या विद्यापीठात अस्तित्वात आहेत. (४) अनेक ठिकाणी दोन वर्षानंतर डिम्ड कन्फर्मेशनची तरतुद आहे. वेगवेगळेपणातही समानता असलेल्या शिक्षकांनी गट करून याबाबत वेगवेगळ्या याचिका आपआपल्या विभागाच्या मा. खंडपीठापुढे दाखल कराव्यात. कागदोपत्री ही समानता ज्यांच्याबाबतीत स्पष्टपणे दिसून येत असेल असा हा प्रत्येक गट किमान २० शिक्षकांचा असावा. तो जास्तीत जास्त १००, २००, ४०० शिक्षकांचा सुद्धा असू शकतो. वेगळेपणा दर्शविणारा गट २० पेक्षा कमी लोकांचा होत असेल तर त्यांनी या उपक्रमात सहभागी न होण्याचा विचार करावा. अशी याचिका दाखल करतांना सामायीक मुद्दे मांडतांना (१) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाप्रमाणे सन १९९१ चे रेग्युलेशन शिफारशीच्या स्वरुपाचे होते, ते पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही. (२) अमुक एका कायद्याच्या तमुक एका कलमान्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन नेटसेट पात्रता सक्तीची करणारा शासननिर्णय सन १९९१ ते २००० या काळात केंव्हाही काढण्यात आलेला नाही (३) पात्रता ठरविण्याचे शासननिर्णय हे कायदेशीर माध्यम नसणे (४) कायदेशीर माध्यम असलेले कुलगूरूंचे निदेश व या मा. राज्यपालांच्या सम्मतीनंतर परिनियम सन १९९९ च्या शेवटी किंवा २००० च्या सुरुवातीला झाले. (५) त्या त्या विद्यापीठाच्या कुलगूरूंनी घेतलेली भूमिका, जाहिराती, मान्यता, परिनियम, कन्फर्मेशन. (६) एक्झम्शन देणारे विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनेक निर्णय (७) शासनाने सभागृहात व सभागृहाबाहेर एकामागून एक दिलेली लेखी आश्वासने (८) ४४ दिवसाच्या संपकाळात वृत्तपत्रातून याबाबत शासनाने जाहीरपणे आश्वासने देणाऱ्या मोठमोठ्या जाहिराती. (९) मा. उच्च शिक्षणमंत्री, मुख्यसचिव व सचिव हे तर सोडाच पण खुद्द मा. मुख्यमंत्र्यांच्या सारख्या ज्येष्ठ पदधारकाकडून होणारे विश्वासघाताचे वर्तन (१०) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील परिच्छेद २१ व २४ हे सामायिक मुद्दे तर मांडावेच व विश्वासघाताची कागदपत्रे अवश्य मांडावीत पण त्याच बरोबर त्या समुहातील प्रत्येक शिक्षकाची वैयक्तीक कागदपत्रे सुद्धा त्या याचिकेला जोडलेली असावीत. समानतेच्या आत असलेले वेगळेपण आपापल्या बलस्थानासह मा. न्यायसत्तेच्या लक्षात आणून देणे व त्याचबरोबर शासन ज्या टोकापर्यंत जाईल त्या टोकापर्यत निष्णात विधिज्ञांची नामांकित फळी या संघर्षामध्ये नेटसेटमुक्त शिक्षकांच्या पाठीशी उभी होणे ही दोन मुख्य उद्दिष्ट्ये या धोरणामागे आहेत.

**(तीन)** सध्याच्या परिस्थीतीत आंदोलनाच्या मार्गाने किंवा विधानमंडळाच्या मार्गाने हा प्रश्न सुटू शकण्याची बाब पूर्णपणे संपुष्टात आलेली आहे असे पक्केपणी समजून चालावे व कायद्याचे प्रश्न त्यामध्ये गुंतलेले असल्याने न्यायालयाच्या मार्गानेच ठामपणे यशाच्या दृष्टीने दृढनिश्चयपूर्वक वाटचाल करण्याचा भाग म्हणून न्यायालयीन याचिकांच्या मजबुत बांधणीसह ठोस व भक्कम अशा प्रकारचा न्यायालयीन संघर्ष उभा करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. मा. औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय होण्यापूर्वी अशा बहु याचिका दाखल होण्यामुळे या प्रकरणाच्या न्यायालयीन प्रवासाचा घटनाक्रम कसा राहिला असता व आता मा. औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय झाल्यामुळे अशा बहू याचिका दाखल होण्यामुळे तो प्रवास कसा होईल याची विधी क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा करुन कार्यकारी मंडळाने विचारपूर्वक हा निर्णय घेतलेला आहे. हे मुद्दाम नमूद करण्यात येत आहे.

**(चार)** या संघर्षाच्या यशस्वीतेसाठी व त्याचबरोबर (१) सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याबाबतची सद्यस्थिती (२) बेकायदेशीरपणे २००६ पूर्वीची खुसपटे काढून सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयातर्फे उभे करण्यात येत असलेले "पडताळणीचे बेकायदेशीर थोतांड" (३) नेटसेटमुक्त शिक्षकांच्या बाबत २७ जुन २०१३ चा शासननिर्णय (४) त्याबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने ९ ऑगस्ट २०१३ च्या बैठकीमध्ये सम्मत केलेला ठराव (५) नेटसेटमुक्त शिक्षकांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी दिलेला निर्णय (६) त्यानंतर निर्माण झालेल्या स्थितीमध्ये करावयाच्या उपाययोजनाबाबतचा महासंघाचा ठराव इत्यादीबाबत तपशीलाने माहिती देण्याकरीता व त्याबाबतच्या वैचारिक जाणीवा मजबूत करण्यासाठी व इतरही संघटनात्मक बाबी स्पष्ट करण्यासाठी महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांचे विद्यापीठ निहाय मेळावे पुढील एक महीन्याच्या काळात आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

**(प्रा.शिवाजीराव पाटील)** **(डॉ. तापती मुखोपाध्याय)**

*अध्यक्ष* *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*****

# MINUTES

### of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the* *28 th July, 2013 at* LOK MAHAVIDYALAYA, WARDHA

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 28 th July, 2013 at LOK MAHAVIDYALAYA, WARDHA. Prof. P. B. Raghuwanshi President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0044, 0048, 0091, 0150, 0166, 0173, 0389, 0525, 0607, 0624, 0831, 1083, 1122, 1161, 1177, 1352, 1362, 1382, 1406, 1538, 1641, 1700, 1792, 1908, 1948, 1959, 1960, 1963, 2046, 2090, 2148, 2149, 2152, 2210, 2283, 2351, 2352, 2369, 2370, 2371, 2399, 2414, 2416, 2432, 2439, 2441, 2523, 2575, 2655, 2664, 2666, 2819, 2867, 2894, 2973, 2985, 3006, 3022, 3081, 3088, 3234, 3237, 3239, 3245, 3257, 3277, 3300, 3313, 3314, 3316, 3321, 3341, 3354, 3370, 3387, 3388, 3397, 3416, 3432, 3435,3449, 3454, 3464, 3478, 3480, 3486, 3488, 3492, 3506, 3508, 3515, 3519, 3520, 3521, 3532, 3550, 3586, 3594, 3595, 3619, 3621, 3640,3659,3661,3674, 3691,3693,3750, 3752, 3771, 3787, 3809, 3816,3818,3822, 3823, 3840,3853, 3880, 3887, 3894, 3896, 3901, 3906, 3963, 3970, 3972, 3975, 3988, 4019, 4034, 4035, 4036, 4047, 4052, 4065, 4076, 4081, 4086, 4097, 4120, 4121, 4132, 4134, 4149, 4150, 4160, 4171, 4175, 4177, 4189, 4202, 4243, 4251, 4318, 4336, 4337, 4346, 4371, 4404, 4416, 4418, 4419, 4420, 4422, 4424, 4426, 4429, 4437, 4448, 4449, 4459, 4465, 4466, 4484, 4492, 4498, 4499, 4526,4527, 4532, 4533, 4548, 4557, 4584, 4599, 4600, 4612, 4630, 4636, 4753, 4760, 4795, 4846, 4864, 4865, 4876, 4879, 4902, 4934, 4953, 4998, 5000, 5003, 5013, 5023, 5032, 5049, 5054, 5086, 5138, 5202, 5234, 5261, 5284, 5298, 5299, 5326, 5337, 5370, 5376, 5377, 5381, 5395.

Signed sheets of papers recording the attendance are included on pages 10 to 18 of and will form part of, the "BOOK OF ATTENDANCE" of General Body meetings.

Agenda of the General Body meeting was circulated on pages 85 to 87 & 109 of 2013 NUTA Bulletin and on pages 55 to 66 of 2013 Ex-file.

## ITEM NO.585 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 7 th October, 2012 at Shri Shivaji Arts, Com. & Science College, Near Rly Station, Akola

*Notes :- 1) Copy of the minutes was Circulated on pages 89 to 96 of 2012 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 7 th October, 2012 at Shri Shivaji Arts, Com. & Science College, Near Rly Station, Akola vide No.CIM/34 Dated 30th October, 2012 published on page 91 of 2012 NUTA Bulletin. No correction was received.*

**विषय क्रमांक ५८५ (१) :**
***प्रा. नरेंद्र आबासाहेब कडू यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.***

प्रा. नरेंद्र कडू यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा. प्रकाश तायडे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

श्री.पुंडलीक महाराज महाविद्यालय नांदूरा (रेल्वे), जि. बुलढाणा येथील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.नरेंद्र आबासाहेब कडू यांचे ९ जून २०१३ रोजी आकस्मिक निधन झाले. त्याचे वय ५७ वर्षाचे होते. प्रा.नरेंद्र कडू हे मितभाषी आणि कुशल संघटक होते. व्यावसायिक जिवनाच्या सुरुवातीपासूनच ते नुटाचे सक्रीय कार्यकर्ते होते. संघटनेच्या आंदोलनात त्यांचा सहभाग नेहमीच असे. एक संघटनेचा चांगला निष्ठावान कार्यकर्ता गेल्याचे आम्हा सर्वांना दुःख आहे. मृताचे आत्मास शांती लाभो आणि त्यांच्या परिवारास या दुःखातून सावरण्याचे सामर्थ्य मिळो ही विधात्याचरणी प्रार्थना.

**विषय क्रमांक ५८५ (२) :**
***प्रा. श्रीमती मंदाकिनी बी. काळे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.***

प्रा. श्रीमती मंदाकिनी काळे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा. नरेंद्र आदमाने यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

आबासाहेब पारवेकर महाविद्यालय यवतमाळ येथील राज्यशास्त्राच्या प्राध्यापिका श्रीमती मंदाकिनी काळे यांचे दि. २५ जून २०१३ रोजी दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले. राज्यशास्त्राच्या विद्यार्थी प्रिय अभ्यासू प्राध्यापिका, राष्ट्रीय सेवा योजनेत सहकार्यक्रम अधिकारी म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले होते. संघटनेच्या त्या आजीवन सदस्य (क्र.२१५१) होत्या. ईश्वर मृतात्म्यास चिरशांतीचा लाभ देवो. ही सभा त्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी आहे.

**विषय क्रमांक ५८५ (३) :**
***प्रा. डॉ. कमलेश मुणोत यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.***

प्रा. डॉ. कमलेश मुणोत यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा. अभय पतकी यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

एस.पी.एम. सायन्स व गिलाणी आर्टस् कॉमर्स कॉलेज घाटंजी येथील रसायनशास्त्र विषयाचे ज्येष्ठ प्राध्यापक प्रा. डॉ. कमलेश मुणोत यांचे २५ एप्रिल २०१३ रोजी अकाली दुःखद निधन झाले. जवळपास १० महिने ते कोमात होते. प्रा. मुणोत अभ्यासू व विद्यार्थीप्रिय प्राध्यापक व नुटा युनिटचे अध्यक्ष राहीले आहेत. ही सभा त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांतीचा लाभ देवो ही प्रार्थना.

**विषय क्रमांक ५८५ (४) :**
***प्रा. शैला अब्राहम यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.***

प्रा. शैला अब्राहम यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ. विकास टोणे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

प्रा.शैला अब्राहम ह्या यवतमाळ येथील लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालयात इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका होत्या. दिनांक २० जून २०१३ रोजी त्यांचे दुःखद निधन झाले. त्या नुटा संघटनेच्या आजीवन सदस्य होत्या (क्र. ४३६५) त्यांच्या अकाली निधनाबद्दल नुटाची ही आमसभा दुःख व्यक्त करीत आहे. ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो ही प्रार्थना.

**विषय क्रमांक ५८५ (५) :**
***प्रा. प्रभाकर शंकरराव जहागिरदार यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.***

प्रा. प्रभाकर शंकरराव जहागिरदार यांच्या दुःखद निधनाबद्दल नारायण मेहरे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद येथील राज्यशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक श्री. प्रभाकर शंकरराव जहागिरदार यांचे २८ मार्च २०१३ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. १९६२ ते १९८८ पर्यत ते राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. राष्ट्रीय छात्रसेनेचे कप्तान व नागपूर विद्यापीठात राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य तसेच सिनेट सदस्य होते. ते नुटा संघटनेचे आजिवन सदस्य (क्र. ५७५) होते. ही सभा त्यांच्या परिवारांच्या दुःखात सहभागी आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना.

**विषय क्रमांक ५८५ (६) :**
***प्रा. दिलीप गणपतराव जावळे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.***

प्रा. दिलीप गणपतराव जावळे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्राचार्य एस.टी.सांगळे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय पुसद जि. यवतमाळ येथील मेकॅनिकल विभागाचे प्रमुख प्रा. श्री.दिलीप गणपतराव जावळे वय ५९ यांचे ११ जून २०१३ रोजी अपघाती दुःखद निधन झाले. नागपूरवरून पुसद येथे जातांना त्यांचे कारला कळंब जवळ भिषण अपघात झाला. त्यांचे सोबत पत्नी अनघाताई व कन्या प्रा. ऋतुजा जावळे या होत्या. ह्या अपघातात तिघेही गतप्राण झाले. प्रा. जावळे नुटाचे आजीव सदस्य होते. (न. ३४२८) नुटाची ही सभा मृतात्म्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी असून ईश्वर मृतात्म्यास चिरशांतीचा लाभ देवो ही प्रार्थना.

शोकप्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यानी आपल्या भावना व्यक्त केल्या. सभाध्यक्षांनी सुद्धा आपल्या भावना व्यक्त केल्या. **सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत**

**सदस्यास आपली आदरांजली वाहिली.** सम्मत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकुल कुटुंबियांकडे पाठवतील असे सभाध्यक्षांनी सांगितले.

## ITEM NO. 586 :

## *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

**CONSIDERED AND APPROVED** the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2012.

***Notes :*** *(i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No.2 of 2013) and was now placed for the approval of the General Body.*

*(ii) The Copy of the Annual Report was circulated on pages 88 to 92 of 2013 NUTA Bulletin.*

*(iii) Dr. A. W. Dhage, Secretary presented the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 587 (A) :

## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

**APPROVED** the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2013.

***Notes :*** *(i) Dr. B. T. Gawande, Treasurer, NUTA, presented the Budget on behalf of the Executive Committee.*

*(ii) The copy of the Budget was circulated on page No. 89 of 2013 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 587 (B) :

**(१)** अंदाज पत्रकावरील चर्चेत सहभागी होत असतांना एका सन्माननीय सदस्यांनी नुटाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक १९ ऑगस्ट २०१२ रोजी विषय क्रमांक ४० अंतर्गत घेतलेल्या सन २०१२ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ ५९ वरील "नुटा बुलेटीनसाठी संगणक यंत्रणा व संगणक संलग्न मुद्रणयंत्रणा" या विषयावरील निर्णयातील पुढील भाग आमसभेत वाचून दाखविला. :- "(३) उपरोक्त यंत्रणा कार्यरत ठेवण्याच्या प्रयोजनार्थ शिपाई व क्लर्क इत्यादी सेवा पुरविण्यासंदर्भात असे नमूद करण्यात येत आहे की अशा कामासाठी आर्थिक बाबी विचारात घेता **पूर्ण कायम स्वरूपी नेमणुका करणे शक्य होत नाही अशा स्वरूपाचा निर्णय या पूर्वीच्या कार्यकारी मंडळाने घेतला असून या कार्यकारी मंडळाने सुध्दा विचारांती तो पुढे सुरु ठेवला आहे.** या कामी सुध्दा त्या निर्णयाशी सुसंगत असाच निर्णय घ्यावा असे ठरविण्यात येत आहे. (A) वेगवेगळया व्यक्तीकडून जरी ही कामे करून घेण्यात आलीत किंवा येतील तरी १ जानेवारी २०१२ पासून दर महिन्याला या कामासाठी पुढील (B) मध्ये ठरविल्याप्रमाणे दरमहा मेहनताना ठरवून देण्यात येत आहे. :- (B) शिपाई, क्लर्क व स्टेनोग्राफर या सेवांच्या करीता दरमहा एकत्रितरित्या १० हजार रुपये एवढा मेहनताना देण्यात यावा. याशिवाय वर्षातून दोन वेळा शासन निर्णयाप्रमाणे महागाई भत्त्यामध्ये जेवढी वाढ होते तितकी वाढ या मेहनतान्यामध्ये करण्यात यावी. उपरोक्त कामासाठी असा मेहनताना अदा करण्याचे अधिकार कोषाध्यक्षांना देण्यात येत आहे." हा मजकूर वाचून दाखविल्यानंतर त्यांनी हे खरे आहे काय? अशी विचारणा केली तसेच (१) अंदाजपत्रकामध्ये आपण 'सॅलरी' या हेडखाली रुपये "२००००" एवढीच रक्कम दाखविलेली आहे व Printing या सदराखाली रुपये "४,२०,०००" एवढी रक्कम दाखविलेली आहे. हे योग्य आहे काय? ती रक्कम 'सॅलरी हेड'खाली का दाखविण्यात आली नाही? अशी विचारणा केली (२) तसेच या ठरावामुळे पुढे पुढे हा खर्च वाढत जाईल हे योग्य आहे काय? अशीही विचारणा केली.

**(२)** त्यावर अध्यक्षांनी "आमसभेत होणाऱ्या **प्रत्येक निर्णयाची** शब्दशः नोंद केली जाते व त्या सभेचे कार्यवृत्त प्रत्येक सदस्याकडे पाठविले जाते. त्याचप्रमाणे कार्यकारी मंडळाच्या **प्रत्येक निर्णयाची** शब्दशः नोंद केली जाते व ते कार्यवृत्त कार्यकारी मंडळाच्या प्रत्येक सदस्याकडे पाठविले जाते." सन २०१२ च्या कार्यकारी मंडळाच्या निर्णयातील पृष्ठ ५९ वरील कार्यवृत्तामधून **मा. सदस्यांनी जो भाग वाचून दाखविला तो सत्य असल्याची माहिती सभागृहाला दिली.**

**(३)** At this stage the following information was given in the house on behalf of the Executive Committee :-

(A) Expenditure on NUTA Bulletin during the year is deducted from the total income of the organization while calculating the income liable to the Contribution to Public Trust Administration Fund Levied on the Association by the Charity Commissioner's office.

(B) These facts are mentioned in "**A Report on the case of Contribution to Public Trust Administration Fund Levied on the Association**" published by the then Joint Secretary of the organization Dr. E.H.Kathale on page 39 & 40 in the 10 th issue of 1981 NUTA Bulletin and it can be recirculated in the NUTA Bulletin for the use of the members.

(C) These lawful concessions were made available to the organization in the year 1980 with the efforts taken by the then Secretary Dr. A.V.Barhate and Treasurer Dr. A.S.Satputale and are based on the **JUDGEMENT (Delivered on 10th November, 1980) by Shri.G.V. Huprikar, M.Sc., LL.M.; Joint Charity Commissioner, Maharashtra State,** Nagpur in Contribution Revision Application No. 9 of 1980 in the matter of:- Nagpur University Teachers' Association, Nagpur. P.T.R.No. F-1564 (Nagpur) Shri Arvind Vasant Barhate, Secretary of the Association.... Applicant. -VERSUS- The Deputy Charity Commissioner, Nagpur Region, Nagpur.... Respondent. This judgement was recently published on page 142 to 144, of 2011 NUTA Bulletin.

**(४)** त्यानंतर कार्यकारी मंडळाच्या वतीने पुढील माहिती सभागृहाला देण्यात आली.

(A) या आमसभेने दिनांक २७ नोव्हेंबर २०११ च्या बैठकीत विषय क्रमांक ५५३ अन्वये घेतलेल्या निर्णयाच्या **(यानंतर उल्लेख "आमसभेचा उपरोक्त निर्णय" असा)** शेवटी पुढील प्रमाणे स्पष्ट उल्लेख आहे. :- "संपर्क माध्यम या नात्याने विश्वसनियता व संदर्भाच्या बाबतीत बिनचुकता या वैशिष्ट्यांच्या माध्यमातून जी कामगिरी नुटा बुलेटीनने केली आहे ती अभिमानास्पद असून सुरुवातीपासूनच मजकुराची निवड करण्याचे जे धोरण स्विकारले गेले त्या धोरणासह योग्यवेळी यथोचित निर्णय घेवून उपरोक्त वैशिष्ट्यांसह ही कामगिरी तशीच सुरु रहावी असा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे."

(B) आमसभेच्या उपरोक्त निर्णयातील परिच्छेद (क) मध्ये पुढील मजकुर आहे :- "**(क)** संघटनेच्या प्रत्येक सदस्यापर्यंत थेट घरपोच व विनामुल्य जावून पोचणारी 'नुटा बुलेटीन'ची सेवा ही संघटनेमार्फत प्रत्येक सदस्याला दिली जाणारी एकमेव व महत्वपूर्ण अशी सेवा आहे. त्यामुळे संघटनेतर्फे केल्या जाणाऱ्या खर्चाच्या क्रमामध्ये पहिला क्रम नुटा बुलेटीनच्या खर्चाचा राहीला आहे. या गेल्या ३०-३५ वर्षामध्ये संपर्क माध्यम व संदर्भ समृद्धी ही बुलेटीनची खास वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील."

(C) आमसभेच्या उपरोक्त निर्णयातील परिच्छेद (क) मधील उपपरिच्छेद (१) व (४) पुढील प्रमाणे आहेत. :- "(१) बुलेटीनच्या प्रकाशनासाठी आवश्यक असलेली "**संगणक यंत्रणा व संगणक संलग्न मुद्रण यंत्रणा**" ही महत्वपूर्ण साधन सामुग्री होय. संघटनेच्या अध्यक्षांकडे वि.प.स. या नात्याने व्यक्तीशः उपलब्ध असलेल्या यंत्रणेवरच सन १९९९ पासून तर २०११ पर्यंत हे काम केले जात असल्यामुळे संघटनेला या काळात अशा यंत्रणेसाठी वेगळा खर्च करावा लागला नाही.......... (४) तयार मजकूराची जुळवणी हा वेगळा भाग असतो पण तो मजकूर तयार करण्याच्या कामासाठी "**स्टेनोग्राफर, टायपीस्ट किंवा क्लर्क, शिपाई**" अशी कोणतीही सेवा आपण यापूर्वी उपलब्ध करून दिलेली नव्हती. **अगदी सुरुवातीपासून आजपावेतो त्याबाबत अध्यक्षांनी व्यक्तीशः केलेल्या व्यवस्थेवरच हे काम भागविण्यात आले.**"

(D) आमसभेच्या उपरोक्त निर्णयातील परिच्छेद (ड) पुढील प्रमाणे आहे.:- "**(ड)** विद्यमान पदाधिकारी व कार्यकारी मंडळाने संघटनेचे एकूणच काम नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांकडे व कार्यकारी मंडळाकडे सोपवितांना कोणत्याही नियत कामामध्ये खंड न पडता यथोचितरित्या ते हस्तांतरीत व्हावे याची काळजी घेतली आहे. नविन व्यवस्था स्थापित होईपर्यंत स्थापित व्यवस्था कार्यरत राहतील याची काळजी घेण्यात येत असल्यामुळे नुटा बुलेटीनच्या प्रकाशनात ताबडतोबीने खंड येण्याचे काही कारण नाही. मात्र असे असले तरी **पूर्वोक्त परिच्छेद (क) मधील उपपरिच्छेद १,२,३ व ४ च्या बाबत नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकारी मंडळाला बुलेटीन प्रकाशनाचे सातत्त्य कायम रहाण्याच्या प्रयोजनासाठी यथासमय यथोचित निर्णय घ्यावे लागतील.**"

**(५)** या चर्चेत सहभागी होताना संघटनेचे माजी अध्यक्ष प्रा.बी.टी.देशमुख यांनी सभागृहाला असे सांगितले की अध्यक्ष या नात्याने माजी अध्यक्षांच्या कार्यकाळातील घटनांबद्दल विद्यमान अध्यक्षांना "जाब" विचारणे अनुचित आहे. आमसभेच्या उपरोक्त निर्णयातील "**अगदी सुरुवातीपासून आजपावेतो त्याबाबत अध्यक्षांनी व्यक्तीशः केलेल्या व्यवस्थेवरच हे काम भागविण्यात आले.**" हे विधान ३१ डिसेंबर २०११ रोजी कार्यकाल संपलेल्या अध्यक्षांना लागू आहे. त्यानंतर (१) १ जानेवारी २०१२ पासून तर ऑगस्ट २०१२ पर्यंत "खर्चाचा परतावा आपल्याला नंतर घेता येईल पण व्यवस्था बंद पडता कामा नये" म्हणून विद्यमान अध्यक्ष व कोषाध्यक्षांनी त्याबाबत यंत्रणा कार्यरत ठेवण्यासाठी तात्पुरती

व्यवस्था केली. ऑगस्ट २०१२ मध्ये कार्यकारी मंडळाने केलेल्या निर्णयानंतरच त्या कामाची स्थिर व्यवस्था अस्तित्वात आली." "३१ डिसेंबर २०११ पूर्वीप्रमाणे हे काम तसेच होत राहील, असे गृहित धरणे योग्य नाही. तसेच या खर्चामध्ये पुढे पुढे वाढ होणार नाही, असेही गृहित धरणे बरोबर नाही. तसेच न्यायनिर्णयाप्रमाणे बुलेटीनच्या खाती होणारा खर्च 'एज्युकेशनल एक्पेंडीचर' धरला जातो. त्या हेडखाली तो न धरता 'सॅलरी हेड'खाली धरणे सुध्दा चूक आहे" असेही त्यांनी प्रतिपादन केले.

**(६)** शेवटी अध्यक्षांनी असे मत नमुद केले की "आमसभेने जबाबदारी सोपविल्यानुसार कार्यकारी मंडळाने दिनांक १९ ऑगस्ट २०१२ रोजी विषय क्रमांक ४० अंतर्गत घेतलेल्या "(३) उपरोक्त यंत्रणा कार्यरत ठेवण्याच्या प्रयोजनार्थ शिपाई व क्लर्क इत्यादी सेवा पुरविण्यासंदर्भात असे नमुद करण्यात येत आहे की अशा कामासाठी आर्थिक बाबी विचारात घेता पूर्ण कायम स्वरूपी नेमणूका करणे शक्य होत नाही अशा स्वरूपाचा निर्णय या पूर्वीच्या कार्यकारी मंडळाने घेतला असून या कार्यकारी मंडळाने सुध्दा विचारांती तो पुढे सुरु ठेवला आहे. या कामी सुध्दा त्या निर्णयाशी सुसंगत असाच निर्णय घ्यावा असे ठरविण्यात येत आहे. (A) वेगवेगळया व्यक्तीकडून जरी ही कामे करून घेण्यात आलीत किंवा येतील तरी १ जानेवारी २०१२ पासून दर महिन्याला या कामासाठी पुढील (B) मध्ये ठरविल्याप्रमाणे दरमहा मेहनताना ठरवून देण्यात येत आहे. :- (B) शिपाई, क्लर्क व स्टेनोग्राफर या सेवांच्या करीता दरमहा एकत्रितरित्या १० हजार रुपये एवढा मेहनताना देण्यात यावा. याशिवाय वर्षातून दोन वेळा शासन निर्णयाप्रमाणे महागाई भत्त्यामध्ये जेवढी वाढ होते तितकी वाढ या मेहनतान्यामध्ये करण्यात यावी. उपरोक्त कामासाठी असा मेहनताना अदा करण्याचे अधिकार कोषाध्यक्षांना देण्यात येत आहे." या निर्णयाप्रमाणेच याबाबतीत खर्च करण्यात येईल व बुलेटीनसाठी करण्यात आलेला हा खर्च "सॅलरी" या हेडखाली न दाखविता "बुलेटीन" या हेडखालीच दाखविण्यात येईल." **अध्यक्षांच्या या मताशी सभेने सहमती व्यक्त केली.**

## ITEM NO. 588 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

**CONSIDERED AND APPROVED** the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2013 namely :-

"**C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant** "**Prabha Niwas**" **Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2013**"

***Notes*** *:- (i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association."*

*(ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 4 of 2013) which was placed before the General Body for its approval.*

*(iii) Dr. B. T. Gawande, Treasurer, on behalf of the Executive Committee, moved the resolution.*

### विषय क्रमांक ५८९ :
### *आंदोलन काळातील घटनाक्रमाचा अहवाल*

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या आंदोलनाच्या ठरावापासून (दिनांक १६ सप्टेबर २०१२) तर आंदोलनाच्या समाप्तीपर्यंतच्या (दिनांक १० मे २०१३) काळातील घटनाक्रमाचा 'नुटाचे अध्यक्ष व महासंघाचे उपाध्यक्ष डॉ. प्रविण रघुवंशी व नुटाचे सचिव व महासंघाचे सदस्य डॉ. अनिल ढगे यांनी तयार केलेला अहवाल **विचारात घेण्यात आला व सम्मत करण्यात आला.**

***टिप*** *:- महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या आंदोलनाच्या ठरावापासून (दिनांक १६ सप्टेबर २०१२) तर आंदोलनाच्या समाप्तीपर्यंतच्या (दिनांक १० मे २०१३) काळातील घटनाक्रमाचा 'नुटाचे अध्यक्ष व महासंघाचे उपाध्यक्ष डॉ. प्रविण रघुवंशी व नुटाचे सचिव व महासंघाचे सदस्य डॉ. अनिल ढगे यांनी तयार केलेला अहवाल सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ७१ ते ८४ प्रसृत करण्यात आलेला होता.*

### विषय क्रमांक ५९०
### *कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरणे*

**(अ)** कार्यकारी मंडळाने दिनांक १६ जुन २०१३ रोजीच्या बैठकीत विषय क्रमांक ३० व ३१ अन्वये मंजूर केलेला पुढील प्रस्ताव **विचारात घेण्यात आला व सम्मत करण्यात आला.**

"प्रा.डॉ. सुभाष गवई यांनी नुटाच्या सहसचिव (अमरावती) पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागी नुटाच्या घटनेतील खंड ५ (ब) मधील तरतुदीनुसार **प्रा. सतेश्वर मोरे यांना सहसचिव म्हणून** तसेच प्राचार्य डॉ. सुभाष भडांगे यांनी सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर **प्रा.श्री. विवेक हिवरे यांना सदस्य म्हणून स्विकृत करावे असे ठरविण्यात येत आहे.**"

*Notes :-* ***(1) Article V*** *(b) of the constitution of NUTA is as follows :-* ***" b) Casual Vacancy :*** *Vacancies on the Executive Committee shall be filled up by the Executive Committee by Co-option from among the members of the Association. Such co-opted member shall hold office till the next annual General Body meeting."*

*(२) यापूर्वी आमसभेच्या दिनांक १ मे २००१ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्रमांक २९३ अन्वये पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला होता. :-* ***विषय क्रमांक २९३ : कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरणे :*** *नुटाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक १ मे, २००१ रोजीच्या बैठकीत विषय क्रमांक ४७ अन्वये मंजूर केलेला पुढील प्रस्ताव विचारात घेण्यात आला व* ***सम्मत करण्यात आला.*** *:-*

*"डॉ. अरुण सातपुतळे यांनी नुटाच्या उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपाध्यक्षपदी (नागपूर) नुटाच्या घटनेतील खंड ५ (ब) मधील तरतुदीनुसार प्रा. अनिल ढगे यांना उपाध्यक्ष म्हणून तसेच प्रा. अनिल ढगे यांच्या सहसचिव पदाच्या रिक्त झालेल्या जागेवर प्रा. व्ही.बी.ढोणे यांना सहसचिव म्हणून स्विकृत करावे असे ठरविण्यात येत आहे."*

**(ब)** कार्यकारी मंडळाने उपरोक्त प्रस्ताव या आमसभेसमोर मान्यतेसाठी न ठेवता फक्त "नोंद घेण्यासाठी ठेवावयास पाहीजे होता" असा व्यवस्थेचा मुद्दा मा. सदस्य प्रा. दिपक धोटे यांनी उपस्थित केला. त्यावर अध्यक्षांनी असा निर्णय दिला की, "कार्यकारी मंडळाची निवडणूक कार्यकाळ संपल्यानंतरच एकदा होते. मधल्या काळात एखादी जागा रिक्त झाली असेल तर ती कोणत्या प्रकारे भरली जावी याबाबत नुटाच्या घटनेतील खंड V (b) मध्ये असलेल्या तरतुदींचा अर्थ लावून यापूर्वीच्या अध्यक्षांनी, कार्यकारी मंडळाने व आमसभेने जी व्यवस्था लावून दिली आहे त्यानुसार "रिक्त पदावर कार्यकारी मंडळ एखाद्या सदस्याला पदाधिकारी म्हणून स्विकृत करते तशी घटनेत तरतुद आहे. त्यावेळी त्या पदाधिकाऱ्याचा कार्यकाल सुरू होतो. (२) पुढच्या आमसभेमध्ये कार्यकारी मंडळाच्या वतीने हा ठराव मान्यतेसाठी ठेवला जातो त्यानंतर त्या स्विकृत पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ सुरू राहतो व तो कार्यकारी मंडळाच्या कार्यकालासोबतच समाप्त होतो." ही जी याबाबतची व्यवस्था यापूर्वीपासून लावून देण्यात आलेली आहे. त्यामध्ये बदल करण्याचा विद्यमान अध्यक्ष व कार्यकारी मंडळासमोर कोणताही प्रस्ताव नाही किंवा तसा विचार नाही त्यामुळे हीच व्यवस्था पुढेही सुरु राहील." **अध्यक्षांच्या उक्त निर्णयाशी आमसभेने सहमती व्यक्त केली.**

### विषय क्रमांक ५९१ :
### *स्थावर मालमत्तेची विक्री*

कार्यकारी मंडळाच्या वतीने डॉ.बी.टी.गावंडे यांनी मांडलेला **पुढील ठराव सम्मत करण्यात आला. :-**

अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीतील सब रजिस्ट्रार अमरावती कॅम्प यांचे कक्षेतील प्रगणे बडनेरा येथील "नझूल प्लॉट नं. ३६, शिट नंबर ६१३ मधील प्लॉट नं. ४ मध्ये असलेल्या गणेशभवन या बिल्डींगमधील पहिल्या माळ्यावरील ब्लॉक क्रमांक ४ ज्याचे एकूण क्षेत्रफळ ५०५ चौरस फुट" या वर्णनाची संघटनेच्या मालकीची असलेली मालमत्ता विकण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. दुय्यम निबंधक अमरावती यांच्या कार्यालयात दिनांक ३० मार्च १९८९ रोजीच्या बुक नंबर १ मध्ये क्रमांक १२०८ वर नोंदविलेल्या दस्तऐवजानुसार ही जागा खरेदी खताद्वारे संघटनेच्या मालकीची आहे. शहरातील संघटनेचे कार्यालय म्हणून वापरण्यात येत असलेली ही मालमत्ता अनेक दृष्टीने गैरसोईची असल्याने हा निर्णय घेण्यात येत असून सोईची जागा उपलब्ध होण्याची वाट न पहाता या निर्णयाची अम्मलबजावणी करण्याचे ठरविण्यात येत आहे.

## ITEM NO. 592 :
## *SUBMISSION OF STATEMENTS OF AUDITED ACCOUNTS FOR THE YEAR ENDING ON 31ST MARCH 2012*

**NOTED** the submission of statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2012 to The Deputy Charity Commissioner Nagpur region, Nagpur by The Secretary NUTA, Dr. Anil Dhage vide his letter No. CC/1/2012, Dated 29 th August 2012

*Notes : 1) Copy of the letter No.CC/1/2012, Dated 29th August 2012 regarding Submission of Audited Accounts was circulated on page 98 of 2013 NUTA Bulletin.*

*(2) Statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2012 were approved by the Executive Committee in it's meeting held on 19th August 2012 vide item No. 28, Agenda on page 40, Minutes on page 54, Enclosure on pages 45 to 47 of 2012 Ex-File.*

*(3) Statements of Audited Accounts of Nagpur University Teach-*

*ers' Association for the year ending on 31st March, 2012 were approved by General Body in its meeting held on 7th October 2012 vide item No. 577. Agenda on page 61, Minutes on page 90, Enclosures on page 62 of 2012 NUTA Bulletin.*

*(4) After the approvals mentioned at notes 2 ~~(& 3)~~ above the Statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2012 were submitted to the Deputy Charity Commissioner, Nagpur region, Nagpur by the Secretary as mentioned at note 1 above.*

*(5) Reference of* ***previous submission*** *for information :-*

Details of the submission of statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2011 to The Deputy Charity Commissioner Nagpur region, Nagpur by The Secretary NUTA, Dr. E.H. Kathale vide his letter No. 49/S/2011, Dated 18/11/2011 are as follows :-

*(i) Copy of the letter No.49/S/2011, Dated 18/11/2011 regarding Submission of Audited Accounts is circulated on page 30 of 2012 NUTA Bulletin.*

*(ii) Statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2011 i.e. were approved by the Executive Committee in it's meeting held on 16th October 2011 vide item No. 43. Agenda on page 77, Minutes on page 85, Enclosure on page 66, 67 & 68 of 2011 Ex-File.*

*(iii) Statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2011 were approved by General Body in its meeting held on 27th November 2011 vide item No. 549. Agenda on page 117, Minutes on page 133, Enclosures on page 118 & 119 of 2011 NUTA Bulletin.*

*(iv) After the approvals mentioned at notes ii & iii above the Statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2011 were submitted to the Deputy Charity Commissioner, Nagpur region, Nagpur by the Secretary as mentioned at note (5) (i) above.*

### विषय क्रमांक ५९३ :
### *'ग्रॅच्युईटी'ची वाढीव रक्कम*

प्रा. एस.एस. खापरे हे अनुपस्थित असल्याने **पुढील ठराव मांडण्यात आला नाही. :-**

**ठराव** :- "१.६.२००६ ते ३०.९.२००९ पर्यंत सेवा निवृत्त झालेल्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना ७ लाख रुपये Gratuity मंजूर करुन कमी दिलेली फरकाची रक्कम महाराष्ट्र सरकारने ताबडतोब अदा करावी अशी मागणी करण्यात येत आहे."

### विषय क्रमांक ५९४ :
### *अवमान याचिकेच्या संदर्भात*

(अ) प्रा. प्रमोद नामदेवराव मुलकुलवार यांनी आमसभेच्या परवानगीने **पुढील ठराव मागे घेतला :-**

**ठराव** :- "याचिका क्रमांक १३२६/२०१२ मा. उच्च न्यायालय मुंबई व अवमान याचिका क्र. १२५/२०१२ मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ, नागपूर या याचिकांमधील निर्णयावर चर्चा करुन त्याबाबतची वस्तुस्थिती सभागृहाला अवगत करणे."

**(ब)** आमसभेच्या नोटीस क्रमांक १ अन्वये सदस्यांकडून विचारार्थ ठराव मागीतले जातात. ठराव मांडणाऱ्या सदस्यांना आपल्या ठरावाच्या माध्यमातून आपले मत सभागृहासमोर ठेवता येते व ते सभागृहाला मान्य झाल्यास ते सभागृहाचे मत बनते. निश्चित स्वरुपाचे अभिकथन, अभिप्राय अथवा शिफारस यांना धरुन ठरावामध्ये नेमकेपणाने व स्पष्टपणे मत व्यक्त होणे आवश्यक असते. अशा प्रकारच्या निश्चित मत प्रतिपादनाच्या अभावामुळे ठराव स्विकारार्ह ठरत नाही. **त्यामुळे अशा प्रकारचे ठराव कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट होणार नाहीत याची कार्यकारी मंडळाने काळजी घ्यावी असेही ठरविण्यात आले.**

### विषय क्रमांक ५९५ :
### *नुटाच्या घटनेमध्ये दुरुस्तीचा ठराव*

(अ) प्रा. संजय काळे यांनी "प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे घटनादुरुस्ती अंतर्भूत असलेला प्रस्ताव घटनादुरुस्तीच्या मार्गानेच आणला जावा" या मताशी आपण सहमत असल्याचे नमुद करुन सभागृहाच्या परवानगीने पुढील ठराव मागे घेतला. :-

**ठराव** :- "संघटनेच्या सेवानिवृत्त आजीव सदस्यांनासुद्धा नुटा संघटनेचे पदाधिकारी होण्यासाठी पुन्हा पात्र ठरवावे असे ही सभा ठरवित आहे."

***Note :- Article X of the Constitution of NUTA reads as follows:-***

***"ARTICLE X : Amendment :-*** *a) Proposal to amend the Constitution may come with fourteen clear days notice either from the Executive Committee or from one fifth of the total membership of the Association;*

*b) The Constitution shall stand amended if the proposal is approved by a majority of not less than two thirds of the members present and voting in its General Body Meeting. "*

**(ब)** उक्त प्रस्तावामध्ये सरळ सरळ घटनादुरुस्तीचा प्रस्ताव अंतर्भूत आहे. संघटनेच्या घटनेमध्ये दुरुस्ती करण्याची कार्यरिती घटनेमध्येच नमुद करण्यात आलेली आहे. ठरावाच्या माध्यमातून घटनेत दुरुस्ती प्रस्तावित करणे त्या कार्यरीतीमध्ये बसणारे नाही. **"प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे घटनादुरुस्ती अंतर्भूत असलेला प्रस्ताव घटनादुरुस्तीच्या मार्गानेच आणला जावा" या पूर्वीपासून चालत आलेल्या व्यवस्थेचे काटेकोरपणे पालन होईल याची कार्यकारी मंडळाने काळजी घ्यावी असेही आमसभेने ठरविले.**

### विषय क्रमांक ५९६ (A) :
### *अहवालात दुरुस्तीचा ठराव*

प्रा. डॉ. प्यारेलाल सुर्यवंशी यांनी "आंदोलनाच्या ठरावापासून (दि. १६ सप्टेंबर २०१२) तर आंदोलनाच्या समाप्तीपर्यंतच्या (दि. १० मे २०१३) काळातील घटनाक्रमाचा अहवाल" या मथळयाखाली जुन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ७१ ते ८४ वर प्रसृत केलेल्या अहवालास सुचविलेल्या दुरुस्तीचा पुढील पहिला ठराव **सभागृहाच्या परवानगीने मागे घेतला.**

"परिच्छेद ३१.१ मध्ये खालील उपपरिच्छेदांचा समावेश करावा. :-

**प्रत्यक्षात शासनाने मार्च २०१३ मध्ये अंशतः कुठलीही थकबाकी अदा केलेली नव्हती हे सर्व संबंधितांना विदीतच आहे.** त्यामुळे या संदर्भात शासनाने मा. उच्च न्यायालयाची दिशाभुल केलेली आहे. नोकरशाहीने मांडलेल्या छळवादाचा जुना अनुभव लक्षात घेता शासनाने मा. उच्च न्यायालयासमोर जरी दि. ३१ जुलै २०१३ पुर्वी थकबाकी अदा करण्याचे भाष्य केले असले तरी ते प्रत्यक्षात कितपत खरे ठरेल हे ३१ जुलै नंतरच सांगता येईल व तसे न झाल्यास त्याबाबत संघटनेतर्फे योग्य ती विधिमय पावले उचलण्यात येतील."

### विषय क्रमांक ५९६ (B) :
### *अहवालात दुरुस्तीचा ठराव*

**(१)** त्यानंतर प्रा. डॉ. प्यारेलाल सुर्यवंशी यांनी आंदोलनाच्या ठरावापासून (दि. १६ सप्टेंबर २०१२) तर आंदोलनाच्या समाप्तीपर्यंतच्या (दि. १० मे २०१३) काळातील घटनाक्रमाचा अहवाल" या मथळयाखाली जुन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ क्रमांक ७१ ते ८४ वर प्रसृत केलेल्या अहवालास सुचविलेल्या दुरुस्तीचा पुढील दुसरा ठराव सभागृहासमोर मांडला. :-

"परिच्छेद ३१.५ मध्ये खालील मजकूराचा समावेश करावा. :-

(अ) मा. उच्च न्यायालयाच्या दि. १० मे २०१३ च्या निकालातील परिच्छेद (८) जसाच्या तसा मुद्रित करावा व त्याखाली खालील मजकूराचा नवीन उपपरिच्छेदाने समावेश करावा.

याचा अर्थ ज्या नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेट-सेट मधून सुट दिल्या जाईल त्यांना नवीन सेवानिवृत्ती योजना लागू राहील असे सरकारी वकीलांनी शासनाचे वतीने मा. उच्च न्यायालयासमोर नमुद केले आहे. **खरे म्हणजे दि. ६ मार्च २०१३ च्या मा. मंत्रीमंडळाच्या इतिवृत्तामध्ये जे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरून उपलब्ध झालेले आहे. त्यामध्ये सेवानिवृत्ती योजनेसंबंधी कुठलाही मजकूर नाही. यावरून नेट-सेट मुक्त शिक्षकांना नवीन सेवानिवृत्ती योजना लागू करण्याचा मोठा घाट शासनाने घातलेला आहे.** असे निदर्शनास येते. याबाबत नजिकच्या काळात जो शासननिर्णय निर्गमित होणे अपेक्षित आहे त्यामध्ये नवीन सेवानिवृत्ती योजना लागू असल्याचा उल्लेख असल्यास हे सर्वात मोठे कौर्यपूर्ण विष त्यामध्ये शिल्लक राहील. नेट-सेट मुक्त शिक्षकांच्यावर नव्याने लादलेल्या अनेक क्रौर्यकर्मापैकी सेवानिवृत्ती बाबतचे क्रौर्यकर्म मात्र मा. उच्च न्यायालयात वैकुंठवासी व्हावयाचे राहून गेले ही वस्तुस्थिती आहे. असे झाल्यास संघटनेतर्फे याबाबत योग्य ते पावले उचलण्यात येतील."

**(२)** कार्यकारी मंडळाच्या वतीने याबाबत पुढील भूमिका मांडण्यात आली. :-

(A) दिनांक ६ मार्च २०१३ रोजी मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयामध्ये **"सदर अध्यापकांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील"** असा निर्णय घेण्यात आला होता. सुरुवातीच्या दोनचार दिवसांत याबाबत थोडासा संभ्रम राहीला, दुरचित्रवाहिन्यावरुन पट्टी काढून घेण्यात आली, संकेतस्थळावर सुद्धा त्या ओळी आल्या नाहीत. मात्र संघटनेच्या सर्व स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी जी माहिती मिळविली त्यानुसार **अधिकृत कागदपत्राच्या आधारावर मंत्रिमंडळाने "सदर अध्यापकांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील" असा निर्णय घेतल्याचे स्पष्ट झाले होते.** सभागृहातील चर्चेमध्ये मा. मंत्रिमहोदयांनी तसे सांगितल्याच्या चर्चेची अधिकृत प्रतिवेदने पदाधिकाऱ्यांना उपलब्ध झाली होती. २२ मार्च २०१३ रोजी विधानपरिषद सभागृहामध्ये मा. उच्च शिक्षण मंत्र्यांच्या लेखी निवदेनाच्या परिच्छेद २ मध्ये स्पष्टपणे **"दिनांक ०६.०३.२०१३ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे......** (अ) दिनांक १९.९.१९९१ ते ३.४.२००० या कालावधीतील ज्या बिगर नेटसेट अध्यापकांनी त्यांच्या सेवा कालावधीत विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिव्याख्याता पदासाठी वेळोवेळी विहित

केलेली अर्हता /पात्रता /(नेटसेट, पीएच.डी., एम.फील) प्राप्त केली नाही. अशा अध्यापकांना त्यांच्या सेवा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्यास मान्यता देण्यात येत आहे. **(ब) सदर अध्यापकांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील.**'' असा उल्लेख आहे.

(B) मा. उच्च न्यायालयासमोर दिनांक १० मे, २०१३ रोजी सादर केलेल्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या शपथपत्रामध्ये " (vi) .......... I say that Respondent No.1 in spite of assurances given earlier to MFUCTO suddenly took a "U" -turn and came out with the idea of counting of future service from the date GR would be issued to regularize the services of all such teachers. **The said decision was taken by the cabinet on 6th March 2013.** This is not only illegal but also in breach of legitimate expectations and therefore the said act attracts promissory estoppel. **The said act of Respondent No.1 is cruel in nature and it violates basic human rights inasmuch as the consequences that follow such decision of Respondent No.1 are as under:..........** (c) loss of the triple benefits of PF, Gratuity and Pension under the old pension scheme with defined contribution and defined benefits to be replaced by the new pension scheme with defined contributions and undefined benefits;" असा स्पष्ट उल्लेख होता. विचाराधिन अहवालाचे उभय लेखक महासंघाचे सदस्य आहेत. त्यामुळे त्यांनी तयार केलेल्या अहवालामध्ये या शासननिर्णयाचा व महासंघाच्या शपथपत्रातील उपरोक्त उल्लेख नमुद आहे.

(C) "सदर अध्यापकांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील." असा निर्णय मंत्रिमंडळाने घेतलेला नसतांना सरकारी वकिलांनी शासनाच्या वतीने उच्च न्यायालयात तसे सांगितले असे दुरुस्तीचा ठराव मांडणारांनी गृहित धरले आहे. ते अत्यंत अयोग्य आहे. मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतलेला आहे. याची खात्रीशीरपणे माहिती करुन घेतल्यानंतरच संघटनांनी त्याबाबत टीका केलेली होती. खात्रीशीरपणे माहिती झाल्यावरच त्या निर्णयावर संघटनेने शपथपत्रात व ठरावात त्यामुळेच पुढे या विचाराधीन अहवालात त्याबाबतची प्रतिक्रिया दिलेली होती.

(D) "**खरे म्हणजे दि. ६ मार्च २०१३ च्या मा. मंत्रीमंडळाच्या इतिवृत्तामध्ये जे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरून उपलब्ध झालेले आहे त्यामध्ये सेवानिवृत्ती योजनेसंबंधी कुठलाही मजकूर नाही.**" अशी शब्दयोजना ठरावाच्या पुरस्कर्त्यांनी केली असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरील बातमी म्हणजे **मंत्रिमंडळाच्या संपूर्ण निर्णयाचे शब्दशः करण्यात आलेले "अधिकृत प्रतिवेदन" असा त्या**

**Pradeep G . Deshmukh**, *LL.M., Advocate*
"Prasanna" 72, Maya Nagar, N-2, CIDCO,
**Aurangabad** - 432 003.
*Ph. (O) 0240-2474433, (R) 2474422 (M) 9421214000, Fax 0240-2474433*
*E-mail : Pradeepg.deshmukh@gmail.com*

**Legal Notice : Date : 02.05.2010**

To,
The Chairman,
University Grants Commission,
Bahadurshah Zafar Marg,
New Delhi - 110 002.

**Sub :** Regarding Legal Notice

Under the instructions and on behalf of my client Mr. C.R.Sadasivan, Advocate High Court in the capacity of President Maharashtra federation of University and College teachers organisations (MFUCTO). University club house B.Road, Church Gate, Mumbai-400020 and Shivajirao A. Patil Joint Secretary R/o. Amalner, Dist Jalgaon I issue this legal notice to you as under;

1) That, my clients organisation is a federal organization of ten associations of college and university teachers in Maharashtra and it represents their causes and grievances.

2) It has been noticed that the ministry of Human Resource Development Dept. of higher education in central Govt. vide its order dated 30th March 2010 have directed the University grants commission as under;

*"i) that the UGC shall not take up specific cases for exemption from the application of the NET Regulations of 2009 after the said Regulations have come into force, for either specific persons or for a specific university/ institution/college from the application of the (UGC (Minimum qualifications for appointment and career advancement of teachers in universities and colleges) 3rd Amendment Regulations, 2009 for appointment as lecturer in universities/ Colleges/institutions;*

*ii) that appropriate amendments to the second proviso to clause 2 of the UGC Regulations 2000 shall be made by UGC to give full effect to the policy directions issued by the Central Government dated 12th November 2008, within a period of 30 days from the date of issue of this direction; and*

*iii) that the decision taken by the UGC in its 468th meeting held on 23rd February, 2010 vide agenda item no. 6.04 and 6.05 to grant specific exemptions form the applicability of NET shall not be implemented as being contrary to national policy."*

3) The UGC in its meeting held on 23.2.2010 being 468th meeting had considered individual cases for grant of exemptions from NET/SET examination and decision for grant of exemption have been take after considering the merit of each case. The UGC has been granting such exemptions since long especially in view of judgment given by Bombay High Court Bench at Aurangabad in Writ petition No. 5022/2001 and other companion matters. **Recently while disposing off Writ petition No. 4266/2006 and other companion matters Nagpur Bench of Bombay High Court also has reiterated the same view and it has been made clear that;**

"So far as the lecturers, who were in service, from 1991 onwards, the issue of exemption to them is claimed to be covered by the orders passed by the UGC on 5.11.2008 based on the Commission's decision in its meeting dated 7th and 8th October 2008. **If any of the petitioners are governed by this communication dated 5.11.2008 addressed by the UGC to the Registrar of the University concerned, undoubtedly, their proposals will have to be considered and approved, as per the said decision of UGC and also the decision of the Government of India,** if any, subsequently taken and applicable to the teacher appointed between the years 1991 to 2006."

4) In view of the directions given by the Hon'ble High Court in judgment referred to above it is incumbent upon UGC to consider the cases of lecturers in the light of law laid down by Hon'ble High court and order passed in various Writ petitions and accordingly the UGC had also considered the individual cases and granted exemptions in favour of thousands of teachers in Maharashtra.

5) However, **it is learnt that, on 4th may 2010 a meeting of UGC is scheduled and the directives given by the ministry of HRD in its's order dtd. 30.3.2010 are going to be considered.** One of the directions given by the ministry is not to implement the decision taken by UGC in it's 468th meeting held on 23.2.2010 vide agenda item No. 6.04 and 6.05 granting specific exemption from applicability of NET. If the UGC is going to consider the directives and if any decision in pursuance to above referred to directive resulting to non implementation of earlier decision granting exemption is taken it will not only have adverse effect on the services and career of thousands of teacher in whose favour decisions are already taken but it will amount to showing disregard to the order passed by hon'ble High Court in above referred to Writ Petitions. It is pertinent to note that University Grant Commission was party to Writ Petitions and after hearing the UGC the judgment have been given and orders have been passed and not only this but same are also acted upon in the past. Under the garb of implementation of directives given by HRD Ministry, **if any decision inconsistent with judgment of Bombay High Court is taken by UGC in it's fourth coming meeting it will amount to willful, intentional and deliberate act of disobedience of the orders passed by Hon'ble High Court and in such situation it may lead to contempt of Hon'bel High Court.**

6) In the meeting of MFUCTO held at Aurangabad on 2nd May 2010 it is unanimously resolved to issue legal notice to UGC pointing out the judgement of Hon'ble High Court and requesting UGC to desist from taking any decision adversely affecting teachers covered by the High Court judgements. It will not be out of place to mention here that even **otherwise also directive No III given in order dtd. 30.3.2010 is nothing but giving retrospective effect and cancellation of exemption with retrospective effect which is not permissible in the eye of law. Such a decision which will not legally and constitutionally permissible may not be taken by Highest academic body like UGC which consists of experts in all fields, including representatives of HRD ministry.**

7) Through this notice I request you to desist from taking any decision adversely affecting the teachers not possessing NET/SET qualification but are eligible for exemptions in view of judgment given by Hon'ble High Court.

Thanking you,

Yours faithfully,
**Pradeep G. Deshmukh**

**मजकूराचा दर्जा असत नाही. हे त्यांनी लक्षात घेतलेले नाही.** असा दर्जा गृहित धरून सुधारणेचा ठराव बांधण्यात आलेला असल्याने तो स्विकारला जावू नये. प्रत्यक्षात मंत्रिमंडळाने "सदर अध्यापकांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील." असा निर्णय घेतलेला आहे हे आमसभेला अधिकृत कागदपत्राच्या आधारे माहीत असतांना अशी शब्दरचना स्विकारण्याचे कोणतेही कारण नाही.

(E) "**याचा अर्थ ज्या नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेट-सेट मधून सुट दिल्या जाईल त्यांना नवीन सेवानिवृत्ती योजना लागू राहील असे सरकारी वकीलांनी शासनाचे वतीने मा. उच्च न्यायालयासमोर नमूद केले आहे.**" ठरावातील या शब्दरचनेमुळे मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेला नाही हे संकेतस्थळावर दिसत असतांना वकिलानेच तसे सांगितले असे गृहित धरल्यामुळेच मुळात तिरस्करणीय असलेला **मंत्रिमंडळाचा निर्णय बाजूला राहून तो निर्णय केवळ उच्च न्यायालयात सांगितल्याबद्दल सरकारी वकिलाबद्दल ठरावात वापरण्यात आलेली शब्दरचना वड्याचे तेल वांग्यावर काढण्याच्या प्रकारातील आहे. त्यामुळे अशा सुधारणेला विरोध करणेच उचित आहे.**

(F) प्रत्यक्षात मंत्रिमंडळाने तसा निर्णय घेतलेला असतांना, मुळात मंत्रिमंडळाने तसा निर्णय मार्च २०१३ मध्ये घेतलेला नाही असे ठरावाच्या कर्त्यांनी गृहित धरल्यामुळेच त्यांनी ठरावामध्ये "**यावरून नेट-सेट मुक्त शिक्षकांना नवीन सेवानिवृत्ती योजना लागू करण्याचा मोठा घाट शासनाने घातलेला आहे असे निदर्शनास येते.**" अशी भाषा वापरलेली आहे. म्हणजे पुढे केव्हातरी ही आपत्ती येण्याची शक्यता आहे असे भासविण्याचा ठरावात प्रयत्न आहे. **नक्की निर्णय झाला आहे हे अधिकृतपणे ठावूक असतांना "घाट घातलेला आहे" "असे निदर्शनास येते" या शब्दरचना मान्य करण्याचे कोणतेही कारण नाही.**

(G) मुळात शासनाने घेतलेला एखादा निर्णय अधिकृत कागदपत्रांच्या आधारावर उपलब्ध करून घेणे व त्याची माहिती प्रत्येक सदस्यापर्यंत पोचविणे हे संघटनेच्या कामापैकी एक प्रमुख काम असते. इथे शासनाने " सदर अध्यापकांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागू राहील." असा निर्णय घेतल्यावर संघटनेतर्फे देण्यात आलेली ही माहिती प्राप्त करुन घेण्याऐवजी व त्यावर विश्वास ठेवण्याऐवजी संघटनेचा एखादा सदस्य संघटनेजवळ असलेली माहिती बाजूला ठेवा व "याचा अर्थ ज्या नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेट-सेट मधून सुट दिल्या जाईल त्यांना नवीन सेवानिवृत्ती योजना लागू राहील असे सरकारी वकीलांनी शासनाचे वतीने मा. उच्च न्यायालयासमोर नमुद केले आहे. **खरे म्हणजे दि. ६ मार्च २०१३ च्या मा. मंत्रीमंडळाच्या इतिवृत्तामध्ये जे महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावरून उपलब्ध झालेले आहे त्यामध्ये सेवानिवृत्ती योजनेसंबंधी कुठलाही मजकूर नाही.** यावरून नेट-सेट मुक्त शिक्षकांना नवीन सेवानिवृत्ती योजना लागू करण्याचा मोठा घाट शासनाने घातलेला आहे. असे निदर्शनास येते." **अशी वाक्यरचना मुळ अहवालात जोडा असा आग्रह धरीत असेल तर तो मान्य करण्याच्या योग्यतेचा असु शकत नाही.**

**(३)** कार्यकारी मंडळाची बाजू मांडणारी भाषणे झाली. दुरुस्तीच्या ठरावाचे सूचक प्रा.प्यारेलाल सुर्यवंशी यांनी ठरावाचे समर्थन करणारे भाषण केले. ठरावाच्या बाजूने काही भाषणे झाली. सर्व चर्चा आटोपल्यावर आपण दुरुस्तीचा ठराव आता सभागृहासमोर निर्णयासाठी टाकतो असे अध्यक्षांनी घोषित केले. त्यावेळी श्री. प्यारेलाल सुर्यवंशी यांनी आपल्या जागेवर उभे राहून "सर्व नेटसेटमुक्त शिक्षकांनी आपल्या सद्सद्विवेक बुद्धीनुसार मतदान करावे" असे मागे वळून सभागृहाला आवाहन केले."

**(४)** अध्यक्षांनी प्रश्न सभागृहासमोर निर्णयासाठी टाकला व आवाजी मतदानाने झालेला निर्णय ठरावाच्या प्रतिकूल बाजूने असल्याचे दिसते असे सांगितले. हा महत्वाचा मुद्दा असल्याने हात वर करुन मतमोजणीद्वारे निर्णय करावा अशी मागणी आल्यावरुन अध्यक्षांनी ठरावाला अनुकूल सदस्यांना हात वर करण्याची विनंती केली व त्यानंतर ठरावाला प्रतिकूल असलेल्या सदस्यांना हात वर करण्याची विनंती केली. एकाही सदस्याने ठरावाच्या अनुकूल बाजूने हात वर केला नाही. **ठरावाच्या प्रतिकूल बाजूनी सर्व हात वर झाल्याने ठराव एकमताने फेटाळण्यात आल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले.**

**(५)** यानंतर सभागृहात आलेले माननीय सदस्य प्रा. प्रमोद मुलकुलवार यांनी "एकदा आवाजी मतदानाने ठराव फेटाळला गेल्यानंतर हात वर करून मतदान घेण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती" असा व्यवस्थेचा मुद्दा उपस्थित केला व त्यावर अध्यक्षांनी निर्णय द्यावा अशी मागणी केली.

**(६)** "सभागृहाच्या कामकाजाचा वेळ वाचावा म्हणून सामान्यपणे आवाजी पद्धतीनेच सभागृहात निर्णय केला जातो. पण एका सदस्यांनी जरी मागणी केली तरी हात वर करुन मतमोजणी केली जाते. याउपर सभागृहाच्या निर्णयाशी काही सदस्यांना आपली मतभिन्नता नोंदवावयाची असेल तर त्यांना ती नोंदविता येते." गेली अनेक वर्षे या सभागृहामध्ये याच पद्धतीने निर्णय होत आहेत व **अध्यक्ष या नात्याने या व्यवस्थेमध्ये बदल करण्याचा कोणताही प्रस्ताव माझ्यासमोर नाही व तसे करण्याची काही गरज आहे असेही मला वाटत नाही" असा अध्यक्षांनी निर्णय दिला.**

**(७)** आम्हाला तीन सदस्यांना सभागृहाच्या निर्णयाला विरोध नोंदवावयाचा आहे, असे सांगितल्यावरुन प्रा. डॉ. प्यारेलाल सुर्यवंशी, प्रा. दिपक धोटे व प्रा. प्रमोद मुलकुलवार यांनी केलेली सभागृहाच्या निर्णयाच्या विरोधात मत कार्यवृत्तामध्ये नोंदविले जावे **ही विनंती मान्य करण्यात येत असल्याचे अध्यक्षांनी सांगितले.**

**विषय क्रमांक ५९७ :**
***मा. उच्च न्यायालयासमोर घडलेल्या घटनाक्रमाबाबतचा महासंघाचा संक्षिप्त ठराव***

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलन समाप्तीच्या वेळी मा. उच्च न्यायालयासमोर घडलेल्या घटनाक्रमाबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २३ जून, २०१३ रोजी मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेला संक्षिप्त ठराव **विचारात घेण्यात आला व सम्मत करण्यात आला. :-**

*__नोट__ :- महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलन समाप्तीच्या वेळी मा. उच्च न्यायालयासमोर घडलेल्या घटनाक्रमाबाबत महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २३ जून, २०१३ रोजी मुंबई येथील बैठकीत सम्मत झालेला संक्षिप्त ठराव सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १०५ वर प्रसृत करण्यात आलेला होता.*

**विषय क्रमांक ५९८ :**
***बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवेसंदर्भातील दिनांक***

## ॲड. प्रदिप देशमुख व महासंघ

दिनांक २ मे २०१० रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाची तातडीची बैठक औरंगाबाद येथे बोलाविण्यात आली होती. "**दिनांक ४ मे, २०१० रोजी दिल्ली येथे होणाऱ्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोग नेटसेटग्रस्त शिक्षकांच्या बाबतीत काही विपरित निर्णय घेण्याची शक्यता असल्याच्या**" बातम्या सर्वच वृत्तपत्रात आल्या होत्या. सर्व कायदेशीर मुद्दे नमूद करून **विद्यापीठ अनुदान आयोगाला कायदेशीर नोटीस देण्याचा महासंघाच्या कार्यकारी मंडळाने निर्णय घेतला.**

२. ॲड. प्रदीप देशमुख हे औरंगाबाद शहरातील निष्णात विधीज्ञ व त्याबरोबरच त्या भागातील अनुशेष निर्मूलनाच्या चळवळीत विशेषत्वाने आघाडीवर असलेले विधीज्ञ. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी फोनवरून वेळ ठरविली व ठरलेल्या वेळी महासंघाचे पदाधिकारी त्यांच्या कार्यालयात पोचले. सुटीचा दिवस असुनही तासादोन तासात त्यांनी नोटीस तयार केली. या नोटीसच्या परिच्छेद ६ मध्ये स्पष्टपणे असे नमूद करण्यात आले होते की, "In the meeting of MFUCTO held at Aurangabad on 2nd May 2010 it is unanimously resolved to issue legal notice to UGC pointing out the judgement of Hon'ble High Court and requesting UGC to desist from taking any decision adversely affecting teachers covered by the High Court judgements" पुक्टोचे जनरल सेक्रेटरी प्रा.व्ही.आर.निकम हे विमानाने त्याच रात्री दिल्लीला रवाना झाले व दुसऱ्या दिवशी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयात त्यांनी लिगल नोटीस दाखल केली व पोचपावती घेतली. **ही नोटीस त्यावेळी सन २०१० च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ६४ वर प्रकाशित केलेली आहे.**

३. उक्त प्रकरणी कायदेशिर बाजू एवढी भक्कम होती की, या प्रकारातील "**काही शिक्षकांना देण्यात आलेले 'एक्झम्शन' रद्द करण्याच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या प्रयत्नाला**" जबरदस्त विरोध करण्याची जी मोहीम महासंघाने हाती घेतली तीचा शेवट "**या प्रकारातील सर्व शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने 'एक्झम्शन' देण्याने झाला**" या मोहीमेची सुरूवात मात्र उपरोक्त नोटीसने झाली होती. प्रा. सदाशिवन हे त्यावेळी महासंघाचे अध्यक्ष होते व आजचे अध्यक्ष प्रा. शिवाजीराव पाटील हे त्यावेळी महासंघाचे सहसचिव होते. याचा उल्लेख या नोटीसच्या पहिल्याच परिच्छेदात आहे. **आज ही नोटीस सोबत पुन्हा प्रसृत केली आहे. महासंघ कोणत्या स्थितीतुन प्रवास करीत होता याची कल्पना या नोटीसच्या वाचनाने येवू शकते.**

४. "ॲडव्हॉक असलेल्या शिक्षकांची संख्या मराठवाड्यात बरीच मोठी आहे. कायद्याप्रमाणे त्यांची सेवा सुद्धा धरावीच लागेल." हे त्या दिवशीच्या चर्चेत ॲड. प्रदिप देशमुख यांनी व्यक्त केलेले मत किती बिनचूक होते ही गोष्ट दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजीच्या मा. औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयाने दिसून आलेली आहे. तुळजापूर जिल्हा उस्मानाबाद येथील २१ अधिव्याख्याते अर्जदार असलेल्या त्याच कालखंडात (सन २०१० मध्ये) दाखल झालेल्या याचिका क्रमांक ११४७७ मध्ये ॲड.प्रदिप देशमुख यांनीच ॲडव्होकेट या नात्याने त्यावेळी याचिकेची मांडणी केलेली होती.

**- डॉ. प्रविण रघुवंशी,** *अध्यक्ष, नुटा*

***२७ जून २०१३ रोजीचा शासन निर्णय***

"राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत" या विषयावर महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक २७ जून २०१३रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाची (क्रमांक : संकिर्ण- २०१२/(१३२/१२)/विशि-१,) **नोंद घेण्यात आली.**

***नोट :-*** *"राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत" या विषयावर महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक २७ जून २०१३रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय (क्रमांक : संकिर्ण- २०१२/(१३२/१२)/विशि-१,) सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ १०७ वर प्रसृत करण्यात आलेला होता.*

**विषय क्रमांक ५९९ :**
***दिनांक २७ जून २०१३ च्या शासननिर्णयाबाबत संघटनेची प्रतिक्रिया***

**(अ)** "राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करुन त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत" या विषयावर महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक २७ जून २०१३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयावरील प्रतिक्रियेचा संघटनेचा ठराव **विचारात घेण्यात आला व पुढील दोन दुरूस्त्यासह सम्मत करण्यात आला. :-**

**दुरुस्ती :** ई-एक्स फाईलच्या पृष्ठ ५८ वरील परिच्छेद १४ च्या

(१) उपपरिच्छेद (C) मध्ये "दिनांक १७ डिसेंबर २०१२"च्या ऐवजी "दिनांक १७ डिसेंबर २००२" असे वाचावे.

(२) उपपरिच्छेद (D) मध्ये "दिनांक १० डिसेंबर २०१२"च्या ऐवजी "दिनांक १० डिसेंबर २००२" असे वाचावे.

***नोट :-*** *दिनांक २७ जून २०१३रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयावरील संघटनेची प्रतिक्रिया नमुद करणारा ठराव सन २०१३ च्या ई-एक्स फाईलच्या पृष्ठ ५५ ते ६६ वर प्रसृत करण्यात आलेला होता.*

**(ब)** या चर्चेमध्ये सहभागी होतांना प्रा.बी.टी.देशमुख यांनी असे प्रतिपादन केले की, "शासनाने आता २३ ऑक्टोबर १९९२ च्या शासन निर्णयाने नेटसेट पात्रता सक्तीची केल्याची भूमिका घेतली आहे. २३.१०.९२ चा शासननिर्णय ३५ दिवसात मृत्यूमुखी पडला. त्यानंतर २७.११.१९९२ च्या शासननिर्णयाने नेटसेट सक्तिचे केले नाही तर तसे करा अशी विद्यापीठांना विनंती केली. "स्टँडर्ड कोड निर्गमित करण्याच्या उपलब्ध कायदेशीर मार्गाचा शासनाने या काळात कधीही वापर केला नाही." शासनाला "स्टँडर्ड कोड"चा मार्ग सोडून इतर मार्गाने पात्रतेच्या अटी ठरविण्याचा अधिकारच नव्हता.

सारांश रुपाने सांगावयाचे झाले तर आणि २५ ऑक्टोबर १९९२ च्या शासन निर्णयास पहिला शासननिर्णय असे म्हटले तर ११ डिसेंबर १९९९ चा शासन

# QUASHED AND SET ASIDE

**'एक्झमशन' मिळालेल्या शेकडो शिक्षकांची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून प्रत्यक्षात धरण्यात आलेली होती. त्याप्रमाणे त्यांना स्थाननिश्चिती देण्यात आली व आर्थिक लाभ सुद्धा देण्यात आलेले होते.** अशा शिक्षकांची संख्या महाराष्ट्रात २ हजाराच्या वर आहे. काही सहसंचालकांनी अशा शिक्षकांची स्थाननिश्चिती रद्द करून त्यांच्यावर 'रिकव्हरी' काढण्याचा बेकायदेशिर प्रयत्न केला असता "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY CIVIL APPELLATE JURISDICTION : WRIT PETITION NO.1893 OF 2010 " या प्रकरणात दिनांक ३ सप्टेंबर २०१० रोजी दिलेल्या निर्णयात मा.उच्च न्यायालयाने :- "It is also common ground that their pay was fixed in the senior scale and the selection grade earlier. They were also paid in the senior scale and the selection grade as per the Government Resolution dated 11th December, 1999. It is also an admitted position that now by the orders which are impugned in these petitions, the Joint Director, Higher Education has cancelled the order made by him earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade " **असे नमूद करुन** "The orders impugned in the petitions, **whereby the orders made earlier fixing the scale of pay of the Petitioners in senior scale and selection grade have been cancelled, are set aside** " **असा निर्णय दिला.** "IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT AURANGABAD WRIT PETITION NO. 1991 OF 2011" या दुसऱ्या एका प्रकरणामध्ये सुद्धा २४ मार्च २०११ रोजी मा. उच्च न्यायालयाने तसाच निर्णय दिला. **अशा शेकडो शिक्षकांची सेवा नेमणुकीच्या दिनांकापासून धरून त्यांना तसे आर्थिक लाभ मिळाले आहेत, मिळत आहेत.**

**(२)** अमरावती विद्यापीठाच्या क्षेत्रामध्येसुद्धा अशा अनेक शिक्षकांना 'एक्झमशन' मिळाल्यानंतर नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून त्यांची सेवा धरून सर्व आर्थिक लाभ त्यांना मिळालेले आहेत व आजही मिळत आहेत. सहसंचालकांनी कुरापत काढली नाही, म्हणून त्यांच्यावर न्यायालयात जाण्याची पाळी आली नाही. मात्र हा साराच अधिकाऱ्यांच्या लहरीनुसार चालणारा कारभार होता. सहसंचालक व संचालक यांची लहर फिरली व ते काम अमरावती विभागात सहसंचालकांनी बंद पाडले. त्यांनी उच्च शिक्षण संचालकांना दिनांक ४ मे २०१० रोजी लेखी एक तक्रार निवेदन दिले.

**(३)** त्यावर तावडतोबच संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कुलसचिव, संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती यांना **दिनांक १० मे २०१० रोजी एक पत्र** (क्रमांक युएनआय/२०१०/अवि/विशि(८) ८०६) पाठविले. *"विद्यापीठ अनुदान आयोगाकडून नेट/सेट मधून सूट मिळालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांना वरिष्ठ व निवडश्रेणी देणेबाबत विद्यापीठाने आयोजित केलेल्या कमिटीबाबत"* असा त्या पत्राचा विषय असून त्याच्या परिच्छेद ३ मध्ये "विद्यापीठ अनुदान आयोगाकडून आपल्या विद्यापीठातील ज्या अधिव्याख्यात्यांना नेट/सेट मधून सूट दिलेली आहे. अशा अधिव्याख्यात्यांची तदर्थ सेवा वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरल्यास आर्थिक भार पडणार असल्यामुळे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ नियम ८(१) मधील तरतुदीनुसार अशा स्वरुपाची कार्यवाही शासनाच्या मान्यतेनंतर करणे आवश्यक आहे." असे कळविले होते. त्याच पत्राच्या परिच्छेद ४ मध्ये त्यांनी **"त्यामुळे उपरोक्त परिस्थितीत यासंदर्भात शासन आदेश होईपर्यंत नेट/सेट मधून सूट मिळालेल्या अधिव्याख्यात्यांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी मध्ये स्थाननिश्चिती देणेबाबतचे शिबिर/समितीच्या बैठका आयोजित करु नये"** असे नमूद केले होते. वस्तुतः ११ डिसेंबर १९९९ च्या शासननिर्णयाप्रमाणे नेमणूकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून दिलेले लाभ मा. उच्च न्यायालयाने कायम ठेवले होते. **वेगळ्या शासन निर्णयाची कोणतीही आवश्यकता नव्हती याची माहिती असतांना संचालकांनी हे पत्र काढले.**

**(४)** उपरोक्त पत्राच्या प्रति त्यांनी (१) विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग अमरावती. (२) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. (३) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई (४) कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे (५) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (६) कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (७) कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव (८) कुलसचिव, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (९) कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (१०) कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर (११) कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई. (१२) **विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/कोल्हापूर/जळगांव/नांदेड/औरंगाबाद/नागपूर" यांना पाठविल्या होत्या.**

**(५)** संचालकाचे हे कोलीत हाती मिळाल्याबरोबर औरंगाबादच्या सहसंचालकांनी दिनांक २ सप्टेंबर २०१० च्या पत्रान्वये त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांना असे कळविले की, **"त्यामुळे आपल्या महाविद्यालयातील १९ अधिव्याख्यात्यांचे तदर्थ सेवा गृहीत धरून वरिष्ठ/निवडश्रेणी साठी वेतन निश्चिती करण्यात आलेली असल्यामुळे सदर वेतन निश्चितीस मान्यता देण्यात येत नाही व प्रस्ताव मूळसेवापूस्तीका परत करण्यात येत आहे."**

**(६)** मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर दिनांक १ ऑगस्ट २०१३ रोजी निर्णयीत झालेल्या सन २०१० च्या याचिका क्रमांक ११४७७ मधील निर्णयानुसार (१) संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पूणे, यांनी दिनांक १० मे २०१० रोजी अमरावती विद्यापीठाला पाठविलेले पत्र व त्याचबरोबर (२) संहसंचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद, यांनी त्या महाविद्यालयाला पाठविलेले दिनांक २९ सप्टेंबर २०१० रोजीचे पत्र. **ही दोनही पत्रे मा. खंडपीठाने निष्प्रभावित केली असून रद्दबादल ठरविलेली आहेत.** QUASHED AND SET ASIDE

निर्णय १२ व्या क्रमांकावर येतो. या काळात शासनाने शासननिर्णय, परिपत्रके, आदेश असे एकूण १२ दस्तऐवज निर्गमित केले. **त्यापैकी एकाही दस्तऐवजामध्ये "कायद्याच्या अमुक कलमान्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन नेटसेटची पात्रता सक्तीची करण्यात येत आहे." असा उल्लेख नाही.** या १२ दस्तऐवजाचा आढावा पुढील प्रमाणे :-

**(१) दिनांक : २३ ऑक्टोबर १९९२** (क्रमांक No. NGC-1892/(2224)/ UNI-4,) या शासननिर्णयाने काय "उजेड" पाडला याचे वर्णन करण्याची गरज नाही. कारण ३५ दिवसाच्या आत शासनाने तो मागे घेतला. शासनातर्फेच निष्प्रभावित केल्या गेला.

**(२) दिनांक : २७ नोव्हेंबर १९९२** (क्रमांक No. NGC 1792/(2224)/ UNI-4,) या शासननिर्णयाने नेटसेट सक्तीची केली नाही. तर "१९९१ च्या आयोगाच्या सुचनेत सर्व तरतुदींना आम्ही पूर्णपणे सहमती दिली असल्याचा गैरसमज २३.१०.९२ च्या आमच्या शासननिर्णयाने निर्माण झालेला आहे. तसे मुळीच नसून फक्त या पात्रतेच्या अटीना शासनाची मान्यता राहील एवढेच आम्हाला शासनातर्फे सांगायचे होते. ही गोष्ट "Since the copy of Notification was attached to Government Resolution, dated 23.10.1992 it has created impression that Government has agreed to all the provisions contained in University Grants Commission Notification, dated 19.9.1991. As already stated above, the intention of Government is only to approve the minimum qualifications laid down by University Grants Commission" या शब्दात नमुद करण्यात आली होती व या शासननिर्णयात आता विद्यापीठांना पात्रतेच्या अटी बदलविण्याबाबत विनंती करण्यात आली होती.

**(३) दिनांक : २ फेब्रुवारी, १९९४** (क्रमांक : युएसजी-१०९३/(२६४९)/ विशि-४) : "अशा शिक्षकांच्या सेवा ३१ मार्च, १९९४ पर्यंत चालू ठेवण्यास शासन मंजुरी देत आहे." "पात्रता धारण करीत असेल तरच त्यांना ३१ मार्च, १९९४ नंतर सेवेत ठेवण्यात यावे."

**(४) दिनांक :- ७ मार्च, १९९४** (क्रमांक :- युएसजी-१०९३/(२६४९)/विशि-४) : "ही मुदत या पत्रान्वये आता दिनांक ३१ मार्च, १९९५ पर्यंत वाढविण्यात येत आहे." "त्यांच्या सेवा ३१ मार्च १९९५ नंतर संपुष्टात येतील."

**(५) दिनांक : २८ एप्रिल, १९९४** (क्रमांक : युएसजी-१०९३/(२६४९)/ विशि-४) : " ही मुदत आता या पत्रान्वये दिनांक ३१ मार्च १९९६ पर्यंत वाढविण्यात येत आहे."

**(६) दिनांक : १४ जुलै, १९९४** (शासन निर्णय, क्रमांक : युएसजी-१३९१/ २०६६/विशि-४) : "ही परीक्षा प्रादेशिक भाषेतून घेण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या गोष्टींचा सांगोपांग विचार करून शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-"

**(७) दिनांक : १३ ऑक्टोबर, १९९५** (क्र.एनजीसी-१२९४/१००५४/(२८५२)- विशि-४) : "३. शासनाच्या असे निर्दशनास आले आहे की, विहित अर्हता प्राप्त उमेदवारांच्या नियुक्त्या जरी ते पात्रता परिक्षा उत्तीर्ण नसले तरी केल्या जातात, व त्यांना परिविक्षाधीन कालावधीनंतर ठेवण्यात येते." "परंतु पात्रता परिक्षा पास नसलेल्या उमेदवारांची नियुक्ती करावयाची झाल्यास त्यांची नियुक्ती ही तदर्थ नियुक्ती म्हणून करण्यात यावी. या नियुक्ती धारकांना सेवेचे कोणतेही लाभ (म्हणजेच एक वर्षानंतरची वेतनवाढ, नियमीत सेवा व ८ व १६ वर्षानंतर मिळणारी वरिष्ठ व निवडश्रेणी) मिळणार नाही याचीही संबंधीतांना योग्य वेळीच जाणीव द्यावी. "

**(८) दिनांक २२ डिसेंबर १९९५** (शासन निर्णय क्रमांक एनजीसी १७९४/ ७१४५/विशि-४) : "अशा अधिव्याख्यात्यांच्या विद्यापीठ सक्षम निवड समितीमार्फत दिनांक ३१.१२.१९९३ पर्यंत झालेल्या नियुक्त्या या आदेशाव्दारे नियमित करण्यात येत आहेत." "नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण करण्याची दिनांक ३१.३.१९९६ ची मुदत या आदेशाव्दारे काढून टाकण्यात येत आहे."

**(९) दिनांक : २० फेब्रुवारी, १९९६** (शासन परिपत्रक क्रमांक : एनजीसी १७९४/७९४५/२८२५अट विशि-४) : "जर कुठल्याही विवक्षित कारणामुळे त्यांना बिगर शैक्षणिक पात्रता प्राप्त उमेदवारांच्या नियुक्त्या कराव्या लागल्या तर उमेदवारांच्या नियुक्ती आदेशात दिनांक २२.१२.१९९५ च्या शासन निर्णयातील शर्ती व अटींचा उल्लेख न चुकता करावा."

**(१०) दिनांक - २२ मे, १९९८** (शासन निर्णय क्रमांक - एनजीसी १२९८/ (४५६२)/विशि.४) : "तसेच या दिनांकापासून पुढे नेट/सेट उत्तीर्ण नसल्याच्या कारणास्तव तदर्थ नियुक्तीवरील अधिव्याख्यात्यांच्या वार्षिक वेतनवाढी रोखण्यात येऊ नयेत."

**(११) दिनांक : २५ जून, १९९८** (क्रमांक : संकिर्ण-२०९८/९७८०/ (४५९१)/ विशि-४) : "४. आपणांस विनंती की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास कळवावे."

**(१२) दिनांक : ११ डिसेंबर, १९९९** (क्रमांक : NGC-1298/(4619)/ UNI.4) या कालखंडाच्या शेवटी ११ डिसेंबर १९९९ रोजीचा शासननिर्णय निघाला. त्यानंतर विद्यापीठाचे निदेश निघाले. मा. राज्यपालांच्या सम्मतीने परिनियम तयार झाले व त्यामुळे ३ एप्रिल २००० पासून नेटसेट सक्तीचे झाले याबाबत कोणाचेही दुमत नाही. त्याबाबत काहीही वाद नाही.

**(क)** मुळ ठरावावर निर्णय होण्यापूर्वी किंवा ते शक्य न झाल्यास आजच्या कामकाजाच्या शेवटी सभा ५-१० मिनिटे तहकुब करुन हा मजकूर ठरावाच्या परिच्छेद १२ नंतर व १३ पूर्वी जोडता येईल काय? याबाबत विचार करावा असेही प्रा.बी.टी.देशमुख यांनी सुचविले.

**विषय क्रमांक ६०० :**
***थकबाकी अदा करण्यासाठी पूरक मागणी***

विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील अध्यापकांची थकबाकी अदा करण्यासाठी १६ जुलै २०१३ रोजी विधानमंडळाला सादर करण्यात आलेल्या सन २०१३ च्या खर्चाच्या पुरक विवरण पत्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सादर केलेल्या पुरक मागणी क्रमांक : डब्ल्यू-२, बाब क्रमांक :२०३ व त्याबाबत मा. मंत्रिमहोदयांनी केलेल्या स्पष्टीकरणात्मक निवेदनाची **नोंद घेण्यात आली.**

***नोट*** *:- विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील अध्यापकांची थकबाकी अदा करण्यासाठी १६ जुलै २०१३ रोजी विधानमंडळाला सादर करण्यात आलेल्या सन २०१३ च्या खर्चाच्या पुरक विवरण पत्रातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सादर केलेल्या पुरक मागणी क्रमांक : डब्ल्यू-२, बाब क्रमांक :२०३ व त्याबाबत मा. मंत्रिमहोदयांनी केलेल्या स्पष्टीकरणात्मक निवेदन सन २०१३ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ११२ वर प्रसृत करण्यात आले होते.*

## ITEM NO. 601 :
## *PARTICIPATION IN A MASSIVE RALLY ORGANISED BY AIFUCTO ON 20 TH SEPTEMBER 2013*

The following resolution moved by Dr. Anil Dhage on behalf of NUTA Executive Committee was adopted.

Resolved to request all the units of NUTA, at College level, Taluka level and at District level, to ensure maximum participation in the rally organised by AIFUCTO on 20 th September 2013.

***Notes :-*** *(1) This decision was taken by the NEC meeting of AIFUCTO held at Baroda on the 7 th July 2013.*

*(2) Extracts from the circular (No. 04/12-13 Dated 12.07.2013) issued by Dr. Asok Barman, General Secretary, AIFUCTO are as follows.:-*

" **(C) UGC Regulations 2013 :** *The General Secretary referred to the Amended UGC Regulations-2013 published last month and termed it extremely disappointing as the Regulations in the present form will not allow teachers any* CAS. Caps *introduced will make it impossible for teachers. The requirements can not be fulfilled by the teachers as the clauses like guiding research & conducting projects are not practicable for all teachers. He has received numerous feedbacks objecting to the Regulations.He also observed that other recommendations of the Anomaly Committee have not been considered at all."*

***"PROTEST RALLY IN DELHI*** *: A massive Rally opposing Amended UGC Regulations 2013 & supporting AIFUCTO demands of strengthening public funded education & control of private academic institutions will be held on 20 th September at 11 am in Delhi at Jantar Mantar. All units are requested to ensure maximum participation in the Rally. Please bring your banners & festoons as the Rally will be made a part of our AIFUCTO documentary."*

*(3) NUTA Executive Committee in its emergent meeting held on 22nd July 2013 resolved to move the above resolution in the meeting of the General Body of NUTA.*

## ITEM NO. 602 :
## *ANNOUNCEMENT IN RESPECT OF CHANGE OF ADDRESS :*

**NOTED** the announcements in respect of ***(A)*** "Change of address" and (B) "Change of address : Acknowledgment No. 26"

***Notes :*** *Announcement in respect of* ***(A)*** *"Change of address" was circulated on page No. 90 of 2013 NUTA Bulletin. and (B) "Change of address : Acknowledgment No. 26" was circulated on page No. 110 of 2013 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 603
## *GOLDEN JUBILEE CELEBRATIONS*

President Dr. P.B.Raghuwanshi on behalf of the Executive Committee of NUTA made the following announcement.

It gives me great pleasure to make the following announcement on behalf of the Executive Committee of Nagpur University Teachers' Association.

2. The AIFUCTO was formed in a Meeting held at Udai Pratap College, Varanasi on 24th April, 1962. The Meeting, presided over by Prof. K.L. Sharma of Jaipur adopted the constitution. Prof. H.N. Singh of Jaunpur was elected the Secretary Convener. AIFUCTO Golden Jubilee celebrations are being held in different cities.

3. The Constitution of the Nagpur University Teachers' Association was adopted on Sunday, the 17th March 1963 and the Organization was formed in the meeting of teachers held at Nagpur on that day. Preamble to the constitution reads : ""Whereas it is expedient to establish an association of teachers in the University and in the Colleges affiliated to Nagpur University, with a view to promoting solidarity, efficiency and welfare and to improving and safeguarding their interest, we the University teachers assembled this day, the 17th of March 1963, do hereby give to ourselves this constitution." The meeting "resolved to appoint an Interim Committee to look after the working of the Association until the Office-bearers are elected in the month of July 1963. The following were unanimously elected as members of the interim committee. :- Professors. R.V. Ranade, P.W. Urdhwareshe, M.G. Bokare, M.G. Vaidya, and S.G. Kolarkar. Prof. R.V. Ranade to act as Convenor of the Committee."

4. With a view to celebrate Golden Jubilee of AIFUCTO and NUTA the Executive Committee of NUTA has decided to organize two functions one at Nagpur and one at Amravati.

5. First function will be held on Sunday the 29th September 2013 at Amravati. On this occasion The General Secretary of AIFUCTO. Prof. Asok Barman will deliver Golden Jubilee address. Prof. C.R. Sadasivan former President of MFUCTO will be the guest of honour. This function will be presided over by our veteran leader Prof. B.T.Deshmukh.

6. Details of the Function to be organized at Nagpur will be announced later.

7. Special issue of NUTA Bulletin designed as ""**OUR SECRETARY'S REPORTS** " will be published at Amravati function.

8. Special Issue of NUTA Bulletin designed as ""**OUR GENERAL BODY**" will be published at Nagpur function.

I request all the teachers in general and members in particular to cooperate in making these Golden Jubilee functions a success.

## ITEM NO. 604
## *HIGH COURT JUDGEMENT*

**NOTED** the Judgement delivered by The High Court of Judicature at Bombay, Nagpur Bench Nagpur in writ Petition No. 1886 of 2012.

***Notes :-** (1) In this Writ Petition No. 1886 of 2012 Shri. Hargopal Madangopal Daga was the petitioner and (1) State of Maharashtra, Department of Higher Education & Employment, through its secretary, Mantralaya, Mumbai - 32. (2) Director of Higher Education Maharashtra State, Central Building,Pune. (3) Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University Nagpur through its Registrar. (4) Nevjabai Hitkarni College through its Principal, Bramhapuri Dist. Chandrapur. (5) Account General Maharashtra (Accounts & Establishment) - II through its Account Officer/PR-XIII, Civil Lines, Nagpur-1 (6) Joint Director of Higher Education, Nagpur Division Nagpur were the Respondents*

*(2) This High Court Judgement was circulated on page 112 of 2013 NUTA Bulletin.*

**विषय क्रमांक ६०५ :**
**प्रतिक्रियेच्या ठरावाला दुरुस्ती :**

सन १९९२ नंतर निर्गमित करण्यात आलेल्या सर्व शासननिर्णयांचा व परिपत्रकांचा एकत्रित आढावा घेवून त्यापैकी कोणत्याही दस्तऐवजाने नेटसेट सक्तीचे केले नव्हते. शासननिर्णयाच्या प्रतिप्रक्रियेच्या ठरावावर विचार करतांना विषय क्रमांक ५९९ वरील ठरावातील परिच्छेद १२ नंतर याबाबतचा मजकूर जोडण्याबाबत प्रा.बी.टी.देशमुख यांनी मांडलेली दुरुस्ती सभेच्या शेवटी ५-१० मिनिटासाठी सभा तहकूब करून रचित करता येईल तर पहावे असा सुरुवातीला विचार केला होता. मात्र आज काम बराच वेळ चालल्यामुळे याबाबत संघटनेच्या कार्यकारी मंडळात किंवा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळात विचार विनिमय करण्यात येईल **असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

**विषय क्रमांक ६०६ :**
**गणसंख्या :**

नुटाच्या घटनेतील खंड ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार गणसंख्येच्या अभावी सुरुवातीला सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात आली होती, **ही बाब कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात येत आहे**, असे अध्यक्षांनी जाहीर केले.

**विषय क्रमांक ६०७ :**
***आभार***

**(अ) ज्येष्ठ सदस्यांचे आभार :** नुटाच्या या आमसभेमध्ये संघटनेचे सेवानिवृत्त ज्येष्ठ सदस्य प्रा. भाऊ बेलसरे, प्राचार्य एस.बी.होटे, प्रा.व्ही.के.पांडे, प्रा.व्ही.एच. घोरपडे, प्रा.सी.डी.कोंगरे, प्रा.गौतम उपस्थित राहिल्याबद्दल अध्यक्षांनी त्यांचे आभार मानले.

**(ब) सभा व्यवस्थेबद्दल आभार :** कार्यकारी मंडळाच्या वतीने अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेचे इतर प्राध्यापक, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, यांनी ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून **सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

| | |
|---|---|
| स्वा / **प्रा. पी. बी. रघुवंशी** | स्वा / **डॉ. अनिल ढगे** |
| ***अध्यक्ष*** | ***सचिव*** |

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2012-14 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **15.08.2013**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 602**.

To,............................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................